www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

दैनिक
तरुणांचा बुलंद आवाज
# युवक आधार
मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले   उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड   कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे   निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील   सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २   अंक : 327   सोमवार दि. 11 ऑगस्ट २०२५   किंमत : ४ रु   पृष्ठ : 6   RNI MAHMAR/2023/89514

## `विद्यार्थ्यांच्या हितासाठी १५ ऑगस्ट २०२५ रोजी लोकशाही मार्गाने शांततेत धरणे आंदोलन करणार; शेख अब्दुल रहीम` 100% विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळाली पाहिजे; हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन

**दैनिक युवक आधार**
**छत्रपती संभाजीनगर :**

छत्रपती संभाजीनगर शहर आणि जिल्ह्यातील विद्यार्थी हितासाठी आम्ही वेळोवेळी आपल्या कार्यालयात निवेदने सादर केली आहेत. दुर्दैवाने, अद्याप त्या निवेदनांवर कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. कारण अनेक शाळा/ विद्यार्थी 100% मोफत पाठ्यपुस्तके पासून वंचित आहे. कारण अनेक शाळा/ मुख्याध्यापकांनी आमच्याकडे लेखी तक्रार केली होती. आम्ही त्याचा आढावा ही घेतला असता त्यांना आजतागायत अनेक शाळांना/ विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळाली नाही. येत्या १२ ऑगस्ट २०२५ पर्यंत जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांना १००% मोफत पाठ्यपुस्तके मिळाली नाहीत, तर १५ ऑगस्ट २०२५ रोजी भारताच्या स्वातंत्र्यदिनानिमित्त दुपारी ४ ते ६ या वेळेत आपल्या कार्यालयासमोर लोकशाही मार्गाने शांततापूर्ण धरणे आंदोलन करण्यात येईल. याची सर्वस्वी जबाबदारी प्रशासनावर राहील असे निवेदन महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन चे राज्य प्रवक्ता तथा हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन चे संस्थापक अध्यक्ष शेख अब्दुल रहीम सर यांनी जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी मा. जयश्री चव्हाण मॅम तसेच निवेदनाची एक प्रत वेदांत नगर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक साहेब यांना देण्यात आली आहे...

आम्ही जवळपास 2 महिन्यापासून 100% विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळाली पाहिजे यासाठी प्रयत्न करीत आहे. समग्र शिक्षा महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद,मुंबई यांनी आमच्या निवेदनाची दखल घेऊन याबाबत शिक्षणाधिकारी प्राथमिक छत्रपती संभाजीनगर आणि जालना तसेच मनपा आयुक्त छत्रपती संभाजी नगर यांना सखोल चौकशीचे आदेश दिले आहे. 12 ऑगस्ट 25 रोजी पर्यंत 100% विद्यार्थ्यांना मोफत पाठ्यपुस्तके मिळाली नाही तर आम्ही शिक्षणाधिकारी प्राथमिक छत्रपती संभाजीनगर कार्यालय समोर धरणे आंदोलन करण्यात येईल. याबाबत कार्यवाही करण्यात आली आहे.
**शेख अब्दुल रहीम,**
**संस्थापक अध्यक्ष: हॅप्पी टू हेल्प फाउंडेशन**
**राज्य प्रवक्ता: महाराष्ट्र राज्य जुनी पेन्शन हक्क संघटन**

# भारतामध्ये सोरायसिसची वाढती समस्या!




मुंबई : त्वचेवरील लालसर, खरखरीत चट्टे आणि सततचा खाज-यामुळे ओळखला जाणारा सोरायसिस हा आजार भारतात वेगाने वाढत असल्याचे आरोग्य तज्ज्ञांचे निरीक्षण आहे. भारतीय त्वचारोग सोसायटी आणि इंडियन जर्नल ऑफ डर्मॅटोलॉजीमध्ये प्रकाशित झालेल्या संशोधनानुसार, भारतात सोरायसिसचे प्रचलन सुमारे ०.४ टक्के ते २.८ टक्के दरम्यान आहे. ग्रामीण भागात रुग्णसंख्या तुलनेने कमी असली तरी शहरी भागात, विशेषतः प्रदूषण, मानसिक ताण आणि जीवनशैलीतील बदल यामुळे हा आजार जास्त प्रमाणात दिसतो. सोरायसिस हा एक ऑटोइम्यून दाहजन्य त्वचारोग असून तो दीर्घकाल टिकणारा आहे. तो केवळ त्वचेवर मर्यादित राहत नाही, तर काही रुग्णांमध्ये सोरियाटिक आर्थ्रायटिस या सांध्यांच्या आजाराचे रूप घेऊ शकतो. इंडियन जर्नल ऑफ डर्मॅटोलॉजी (२०२३) च्या आकडेवारीनुसार, सोरायसिस असलेल्या सुमारे २० टक्के ते ३० टक्के रुग्णांमध्ये सांधेदुखीची लक्षणे दिसतात, जी उपचार न झाल्यास कायमस्वरूपी विकृती निर्माण करू शकतात. भारतामध्ये सोरायसिसवरील राष्ट्रीय स्तरावरील संपूर्ण सर्वेक्षण अद्याप मर्यादित असल्यामुळे नेमकी राज्यनिहाय आकडेवारी उपलब्ध नाही. मात्र, एम्स, दिल्ली आणि पीजीआयएमइआर चंदीगढच्या रुग्णालयीन अभ्यासानुसार उत्तर भारतात हा आजार सुमारे २.३ टक्के प्रौढांमध्ये आढळतो, तर दक्षिण भारतात हा दर ०.४ टक्के ते १.५ टक्के इतका आहे. तज्ज्ञांच्या मते, हवामानातील फरक, आहार पद्धती, आनुवंशिक घटक आणि पर्यावरणीय परिस्थिती यामुळे प्रचलनात भौगोलिक फरक दिसतो. शहरी भागात मानसिक ताण, झोपेचा अभाव, प्रदूषण, मद्यपान, धूम्रपान आणि असंतुलित आहार हे घटक सोरायसिसच्या लक्षणांना बळकटी देतात.

२०२२ मध्ये आयएडीव्हीएलच्या त्वचारोग तज्ज्ञांच्या सर्वेक्षणात ६५ टक्के डॉक्टरांनी कोविड-१९ महामारीच्या काळात सोरायसिस रुग्णांमध्ये लक्षणे वाढल्याचे नमूद केले. सरकारी रुग्णालयांमध्ये मेथोट्रेक्सेट, सायक्लोस्पोरिनसारखी औषधे तुलनेने कमी किमतीत उपलब्ध असली तरी, बायोलॉजिकल थेरपी सारखे प्रगत उपचार अजूनही महागडे आहेत. एका बायोलॉजिकल औषधाचा मासिक खर्च २५ हजार ते ४० हजार रुपयांपर्यंत जाऊ शकतो, जे बहुतेक रुग्णांसाठी परवडणारे नाही. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, सोरायसिसला केवळ सौंदर्यदृष्ट्या त्रासदायक आजार मानून चालणार नाही, तर त्याला हृदयविकार, मधुमेह, स्थूलत्व आणि मानसिक नैराश्याशी जोडलेला गंभीर आजार म्हणून ओळखायला हवे.

तज्ज्ञांचे मत एम्स दिल्लीस्या त्वचारोग विभागातील डॉक्टरांच्या मते, भारतामध्ये सोरायसिसवरील जनजागृती अजूनही कमी आहे. रुग्ण लक्षणांकडे सुरुवातीला दुर्लक्ष करतात आणि उशिरा उपचार घेतात. लवकर निदान आणि सततचा उपचार हा सांध्यांवरील आणि इतर अवयवांवरील दुष्परिणाम टाळण्यासाठी अत्यंत महत्त्वाचा आहे.आ रोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाने २०२४ मध्ये नॉन-कम्युनिकेबल डिसीज (एनसीडी) अंतर्गत त्वचारोगांच्या नोंदीसाठी डिजिटल प्लॅटफॉर्म सुरू करण्याची घोषणा केली आहे, ज्यामुळे सोरायसिससारख्या दीर्घकालीन आजारांची अचूक आकडेवारी मिळवणे आणि धोरण आखणे सोपे होईल. सोरायसिसवर मात करण्यासाठी केवळ औषधोपचार नव्हे, तर जीवनशैलीतील बदल, मानसिक आरोग्याची काळजी, नियमित व्यायाम, संतुलित आहार आणि तणाव नियोजन महत्त्वाचे असल्याचे तज्ज्ञांचे एकमत आहे. भारतातील वाढत्या प्रकरणांच्या पार्श्वभूमीवर हा आजार सार्वजनिक आरोग्याच्या अजेंड्यावर प्राधान्याने असणे आवश्यक असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

## परतूर एस.टी.आगारात रक्षाबंधन केले उत्साहात साजरे....

**दैनिक युवक आधार**
**परतूर -जालना (अशोक ठोके )**

दि.10 ऑगस्ट 2025 रोजी राज्य परिवहन महामंडळ परतूर यांच्या वतीने परतूर आगारात विश्वविद्यालय प्रजापिता ब्रह्मकुमारी यांच्या अनुषंगाने रक्षाबंधना निमित्त कार्यक्रम आयोजित केला होता. या कार्यक्रमात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ यांच्या राज्य परिवहन कर्मचाऱ्याना रेखा दीदी, अंजू दीदी व सुरवसे माता यांनी परतूर आगार प्रमुख व कर्मचाऱ्यांना राखी बांधून रक्षाबंधन प्रचंड उत्साहात साजरे केले. नंतर रेखा दीदी, अंजू दीदी व सुरवसे माता यांनी व्यसनमुक्तीवर आरोग्य सुदृढ व मन प्रसन्न रहावे या करिता राज्य परिवहन महामंडळाच्या कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी राज्य परिवहन महामंडळ परतूर आगार प्रमुख श्रीमती माधुरी देशमुख/जगताप , रेखा दीदी ,अंजू दीदी, व सुरवसे माता व मोठ्या संखेने परतूर आगारातील प्रशासकीय कर्मचारी , चालक वाहक यांत्रिक कर्मचारी उपस्थित होते.












## कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खडवली तर्फे पारस बालभवनात रक्षाबंधन सोहळा मोठ्या उत्सवात साजरा

**दैनिक युवक आधार**
**मुंबई (शांताराम गुडेकर)**

मैत्रेय बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित जी. के. एस. कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय खडवलीच्या संस्थाचालक श्रीमती कविता शिकतोडे मॅडम यांच्या मार्गदर्शनातून बालभवन शैक्षणिक पुनर्वसन निवासी वसतीगृह टिटवाळा,म्हसकळ येथे रक्षाबंधन सोहळा साजरा करण्यात आला. बहिण भावाचे पवित्र प्रेम रक्षाबंधन या कार्यक्रमातून पहायला मिळाले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. प्रशांत तांदळे सर कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य श्री. शफीक शेख सर इतिहास विभागाचे प्रमुख प्रा. श्री. दिनेश घरत सर, प्रा . महेश कांबळे सर, प्रा. रसिका लोकरे, प्रा. रिया बांगर या शिक्षकांनी अतिशय शिस्तबद्ध व उत्साहाने कार्यक्रम पार पाडला. कार्यक्रमात सर्वप्रथम माई सौ. संगीता गुंजाळ यांचा पुष्पगुच्छ देऊन महाविद्यालया मार्फत सत्कार स्वागत करण्यात आला.कार्यक्रमाची प्रस्तावना श्री .घरात सर यांनी केली. माणुसकी बघितली तर दिसते ,मानली तर मिळते व ओळखली तर शेवटपर्यंत राहते असे प्रतिपादन सौ. संगीता गुंजाळ(माई) यांनी पारस बाल भवनाची माहिती देताना आपल्या भाषणात व्यक्त केले.

कार्यक्रमास कु.अनुष्का, साक्षी, कृतिका ,रुपाली,अलबीना ,जस्सीका ,श्वेता, ऋतिका,ज्योती ,दिव्या ,मयुरी, सारिका, प्रणिता , निकिता, सुष्मिता इत्यादी विद्यार्थिनींनी महाविद्यालयात स्वता राख्या बनविल्या व बालभवन मधील मुलांना त्या राख्या बांधल्या. याप्रसंगी बालभवन मधील मुलांना खाऊ वाटप करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावरचा निरागस भाव व आनंद झळकलेला पाहून सर्वांचं मन भरून आलं. मुलं इतकी खुश होती की त्यांनी एक सुरात अनेक गीते सादर केली.या कार्यक्रमाचा समारोप सौ. रसिका लोकरे यांच्या मनोगताने करण्यात आला.

## तक्का गाव परिसरात गाड्यांचे सायलेन्सर चोरीच्या वाढत्या घटना

**दैनिक युवक आधार**
**पनवेल दि. १० ( वार्ताहर )**

पनवेल शहरातील तक्का गाव परिसरात गाड्यांचे सायलेन्सर चोरीला जाण्याचे प्रकार वाढल्याने वाहन मालक चांगलेच त्रस्त झाले आहेत . येथील तिघा जणांच्या गाड्यांचे सायलेन्सर चोरीला गेले आहेत. सदर चोरटे परिसरात सीसी टीव्ही फुटेज मध्ये कैद झाले आहेत . या बाबतची माहिती पोलीस ठाण्याला सुद्धा देण्यात आली आहे . वाढत्या चोऱ्यांच्या घटना मुळे आता ग्रामस्थांयाना व गावातील यूवकांना आता रात्री जागता पहारा ठेवणे गरजेचे झाले आहे .

**फोटो - सायलेन्सर चोरी**





पनवेल शहर पोलिसांचा गुन्हेगारांनी घेतला धसका; गेल्या महिन्यात ३८ गुन्हे उघडकीस, ५७ जणांना अटक, ७१ लाखांचा मुद्देमाल जप्त पनवेल दि. १० ( वार्ताहर ) : पनवेल शहर पोलीस ठाण्याने जुलै महिन्यामध्ये एक उल्लेखनीय कामगिरी करत ३८ गंभीर गुन्हे उघडकीस आणून त्यातील ५७ जणांना गजाआड केले आहे. पोलिसांनी उघडकीस आणलेल्या गुन्ह्यांमध्ये चोरी, जबरी चोरी, घरफोडी, फसवणूक आणि अमली पदार्थांशी संबंधित गुन्ह्यांचा समावेश असून, पोलिसांनी त्यांच्याकडून एकूण ७१ लाख रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. पोलिसांच्या या कारवाईबद्दल या भागातील नागरिकांकडून त्यांचे कौतुक होत आहे. या कारवायांमध्ये पोलिसांनी पनवेल येथील एका कुटुंबाला शेतातून गुप्तधन काढून देण्याच्या बहाण्याने त्यांचे ३९ लाख ७० हजार रुपये किमतीचे सोने आणि रोख रकमेची फसवणूक करणाऱ्या भोंदूबाबाला पनवेल शहर पोलिसांनी कोल्हापूर जिल्ह्यातून अटक करून त्याने फसवणूक केलेले सर्व दागिने व रोख रक्कम पोलिसांनी जप्त केली आहे. दुसऱ्या गुन्ह्यात आयफोन चोरुन नेणाऱ्या चोरट्याचा पाठलाग करत ओडिशातील त्याच्या मूळगावी जाऊन अटक केली. या कारवाईत पोलिसांनी पुराने वेढलेल्या गावात फायर ब्रिगेडच्या मदतीने ८ किमी. पाण्यातून प्रवास करत त्याला ताब्यात घेत त्याच्याकडून ७ लाख २४ हजार ५०० रुपये किमतीचे ५ आयफोन जप्त केले. पनवेल बस स्थानक परिसरात प्रवाशांना लिफ्ट देण्याच्या बहाण्याने लुटणाऱ्या टोळीला अटक करत २ लाख २७ हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. तसेच, रेल्वे स्थानक परिसरात बॅग चोरणाऱ्या टोळीतील ५ आरोपींना अटक करून ११ लाख ६७ हजार रुपये किमतींचा मुद्देमाल हस्तगत केला. त्यातून २ गुन्हे उघडकीस आले. नवी दुकानांचे शटर उचकटून चोरी करणाऱ्या टोळीला ताब्यात घेत त्यांच्याकडून ४ लाख ९५ हजार ८१० रुपये किमतीचे ४५ मोबाईल जप्त करत पोलिसांनी ४ गुन्हे उघडकीस आणले . नवी मुंबई पोलीस आयुक्त मिलिंद भारंबे, सहआयुक्त संजय येनपुरे, परिमंडळ ३ चे पोलीस उपायुक्त प्रशांत मोहिते आणि पनवेल विभागाचे सहाय्यक आयुक्त भाऊसाहेब ढोले यांच्या मार्गदर्शनाखाली या साऱ्या कारवाया पनवेल शहर पोलीस ठाण्याचे वपोनि. नितीन ठाकरे, पोनि. (गुन्हे) शाकीर पटेल, पोनि. (प्रशासन) अभिजीत अभंग यांच्यासह त्यांच्या सहकाऱ्यांनी ही कामगिरी यशस्वी केली.

पनवेल शहर पोलीस ठाण्याच्या या यशस्वी कामगिरीचे संपूर्ण श्रेय आमच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाला आणि पोलीस पथकाच्या अथक परिश्रमाला जाते. वरिष्ठांच्या मार्गदर्शनामुळेच आम्ही एका महिन्यात ३८ गुन्हे उघडकीस आणून ५७ आरोपींना अटक करत त्यांच्या ताब्यातून ७१ लाखांहून अधिक किमतीचा मुद्देमाल जप्त करू शकलो -
**वपोनि. नितीन ठाकरे, पनवेल शहर पोलीस ठाणे**

## तुर्भे परिसरात चोरीस गेलेले व हरवलेले 63 मोबाईल पोलिसांनी काढले शोधून

**पोलिसांचे आभार**
**दैनिक युवक आधार/**
**उरण शहरप्रतिनिधी/सायली साळुंके**

तुर्भे पोलीस ठाणे हद्दीतून चोरीच केलेले व हरवलेल्या मोबाईल फोनचा तांत्रिक पद्धतीने तपास करून पोलिस नाईक 3166 रोहित राठोड यांनी एकूण 63 मोबाईल ज्यांची आजमितीस अंदाजे किंमत 12,03,769/- असून ते हस्तगत करण्यात यश मिळाले असल्याने रोहित राठोड यांचे काम कौतुकास पात्र असल्याची चर्चा होत असून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. हस्तगत करण्यात आलेले सर्व मोबाईल हे गुरुवारु दिनांक 7/6/2025 रोजीमोबाईल मालकांना पोलीस ठाण्यात बोलावून त्यांचे मोबाईल सन्मानपूर्वक परत करण्यात आले. या वेळी मोबाईल परत मिळालेल्या नागरिकांनी समाधान व्यक्त करून जनमानसातील पोलिसांची प्रतिमा उंचावल्याबद्दल पोलीस ठाण्याचे सर्व अधिकारी, अमलदार यांच्या शोध कार्याचा नागरिकांनी विशेष उल्लेख करून सर्वांचे आभार मानले केले असे वरिष्ठ पोलीस निरीक्षक आबासाहेब पाटील यांनी माहिती देताना आमच्या प्रतिनिधीला सांगितले.



## सणसर चे ग्रामस्थ बसस्थानकाच्या प्रतीक्षेत प्रशासन कुंभकर्ण झोपेत

### सणसर ग्रामपंचायत येथे लवकरच आंदोलन

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**

इंदापूर तालुक्यातील सर्वात मोठे गाव सणसर असून सध्या इंदापूर तालुक्यात संत तुकाराम महाराज पालखी महामार्ग चे काम चालू असून पालखी महामार्गचे काम करत असताना सणसर गावातील बस स्थानक थांबा जवळपास एक वर्षांपूर्वी काढण्यात आला असून आजपर्यँत नवीन बसथांबा परत बसवण्यात आला नसल्यामुळे सणसर ग्रामस्थ व परिसरातील नागरिक यांचे मोठ्या प्रमाणात हाल होत असल्याचे दिसत आहे.सध्या सणसर गावात पालखी महामार्ग रोडचे काम चालू असून ते काम पालखी प्रस्थान ते मुक्काम पर्यंत ठेकेदार व प्रशासन कामाची गडबड करून काम केले जात असल्याचे दिसत होते.आता पालखी परत फिरून देहू येथे पोहचली तरी रस्त्याचे काम रखडलेले दिसत असून पालखी महामार्गच्या चुकीच्या नियोजनामुळे सणसर बसथांबा काढण्यात आला असून याचा फटका विध्यार्थी ग्रामस्थ व परिसरातील जेष्ठ महिला नागरिक यांना बसत असल्याचे दिसत आहे.सणसर येथे बसथांबा नसल्याने जेष्ठ नागरिक महिला विध्यार्थी यांना ऊन पाऊसामध्ये उभे रहावे लागत असल्यामुळे खूप हाल होत असल्याचे दिसत आहे.तरी याबाबत लवकरच सणसर ग्रामस्थ ग्रामपंचायत येथे आंदोलन करण्यात येणार असल्याचे बोलले जात आहे.



## पनवेलमध्ये जागतिक आदिवासी दिनाचा जल्लोष

### ठाकूर व कातकरी समाज एकवटला ; आ. प्रशांत ठाकूर, आ. विक्रांत पाटील यांची लाभली प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**संतोष आमले**

संयुक्त राष्ट्र संघाने सन १९९४ रोजी ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून घोषित केले. त्या काळापासून जागतिक आदिवासी दिन जगात एक उत्सव म्हणून साजरा केला जातो. जसं जशी समाजात जनजागृती होत गेली तस तशी ९ ऑगस्ट, जागतिक आदिवासी दिन मोठ्या उत्सहाने साजरा होतांना दिसत आहे. भारत देशात, राज्यात, जिल्ह्यात आदिवासी दिन साजरा होत असतांना पनवेल तालुक्यात ठाकूर व कातकरी समाजाने जागतिक आदिवासी दिन उत्सव समितीच्या माध्यमातून मोठया संख्येने व उत्साहाने जागतिक



आदिवासी दिन साजरा करण्यात यशस्वी झाले. पनवेल तालुक्यातील विविध भागातून आलेल्या आदिवासी समाजातील रॅल्या या तालुक्यातील क्रीडा संकुलन या ठिकाणी पोहचल्या. हजारोंच्या संख्येने उपस्थिती असणारे आदिवासी बांधवाना पनवेलचे आमदार श्री. प्रशांत ठाकूर आणि विधान परिषदचे आमदार श्री. विक्रांत पाटील यांनी मार्गदर्शन केले. आ. प्रशांत ठाकूर यांनी योजनाची माहिती दिली तर आ. विक्रांत पाटील यांनी देशाच्या राष्ट्रपती पदावर असणाऱ्या आदिवासी महिला द्रौपदी मुर्मी यांच्या जीवनाचा इतिहास सांगत पनवेमध्ये आदिवासी बांधवाकारिता आदिवासी भवन उभारण्यासाठी प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. तसेच जागतिक आदिवासी दिनानिमित्ताने उपस्थित असणाऱ्या ५ हजार आदिवासीकारिता नाश्ताची व्यवस्था आ. विक्रांत पाटील यांनी केल्याने आदिवासी दिन उत्सव समितीने आमदारांचे आभार मानले. त्यानंतर सुयोग्य पद्धतीने आदिवासी बांधवानी रॅली काढत कर्मवीर भाऊराव पाटील, छत्रपती शिवाजी महाराज, घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या स्मारकाला पुष्प अर्पण केले. तसेच धरती आबा बिरसा मुंडा यांचे उभेहूब वेशभूषा करणारे धोदाणी गावातील आनंता सांबरी यांचे समाज बांधवांनी कौतुक केले. यावेळी जागतिक आदिवासी दिन उत्सव समिती पनवेलचे अध्यक्ष कृष्णा वाघमारे, उपाध्यक्ष गणपत वारगडा (पत्रकार) सचिव अनिल वाघमारे, एकनाथ वाघे गुरुजी, हिरामण नाईक, सी के वाक, धर्मा वाघ, अरुण कातकरी, मालडुंगे ग्रामपंचायतीचे सरपंच सीताराम चौधरी, कुंदा पवार, पांडुरंग पारधी, रामदास वाघमारे, आत्माराम भस्मा, रमेश वाघे, अशोक पवार, जना घुटे, रमेश भस्मा, चंद्रकांत संबरी, जनार्दन निरगुडा, पदमाकार चौधरी, सुनिल वारगडा, हिरामण पारधी, बाळू वाघे, राम नाईक, पांडुरंग भगत, मैद्या वाघ आदी. हजारोच्या संख्येने आदिवासी बांधव उपस्थित होते.

## मातोश्री शांताबाई गोटे महाविद्यालयात आर्यन व फॉलिक ॲसिड गोळ्या वाटप

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**




"राष्ट्रीय सेवा योजना पथक व महिला सक्षमीकरण समिती यांच्याचा पुढाकार"

स्थानिकः- मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना पथक व महिला सक्षमीकरण समिती द्वारा दिनांक 28 जुलै 2025 रोजी महाविद्यालयातील विद्यार्थिनींना फॉलिक ॲसिड व आयरन गोळ्या वाटप करण्यात आल्या या कार्यक्रमाच्या प्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे कार्यकारी प्राचार्य डॉ. बी. आर. तनपुरे हे होते तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून महाविद्यालयातील महिला विकास समितीच्या अध्यक्ष डॉ.एस.व्ही. रुक्के तसेच डॉ. पी. एस. पाथरकर या उपस्थित होत्या याप्रसंगी डॉ. पी. एस. पाथरकर यांनी महिलांना आयरन व फॉलिक ॲसिड याची आवश्यकता कशाप्रकारे आहे व त्याचे फायदे काय आहेत यासंबंधी विद्यार्थ्यांनीना मार्गदर्शन केले. तसेच महिलांनी आपले आरोग्य सुदृढ ठेवण्यासाठी नियमित शारीरिक व्यायाम करणे गरजेचे आहे यावर सुद्धा मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. बी. आर. तनपुरे यांनी महिलांमध्ये असणारे आजार प्रामुख्याने हे महिला आपल्या आरोग्य विषयी जो निष्काळजीपणा ठेवतात त्यातून होतो त्यासाठी महिलांनी आपल्या शारीरिक स्वास्थ्याकडे विशेष लक्ष द्यावे असे विद्यार्थिनींना आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. डी. एन. लांजेवार यांनी केले तर आभार सानिका वानखडे हिने व्यक्त केले.

## अनाहत आरोग्य हॉलिस्टिक सेंटर चे उद्घाटन बालकलाकार अर्जुनी आणि प्रसाद हनुमंते यांच्या हस्ते संपन्न

**्रसाद हनुमंते (पनवेल):**

अनाहत आरोग्य हॉलिस्टिक सेंटर चे उद्घाटन राज्यात सर्वाधिक लोकप्रिय ठरत असलेली अष्टपैलू बालकलाकार अर्जुनी आणि भाजपा सोशल मीडिया जिल्हा संयोजक ओबीसी मोर्चा चे प्रसाद हनुमंते यांच्या हस्ते संपन्न झाले. अनाहत हिलिंग सेंटरमध्ये आक्युपंचार, आक्युप्रेशर, कपिंग, मेडिकल योग आणि साउंड हिलिंगसह गुडघेदुखी, मानदुखी, स्नायूंचे आजार, मायग्रेन, सांधेदुखी, फ्रोजन शोल्डर, स्पॉन्डायलोसिस, टेनिस एल्बो, टाचदुखी, डिप्रेशन, स्ट्रेस मॅनेजमेंट, झोपेचे विकार अशा अनेक तक्रारींवर विना औषध व विना साइड इफेक्ट उपचार केले जातात.




तसेच, आरोग्य चांगले ठेवण्यासाठी नियमित योग वर्गांची सुविधाही उपलब्ध आहे. हे सेंटर कामोठे सेक्टर २२, रिद्धी-सिद्धी सोसायटी, प्लॉट क्रमांक १११ येथे सुरू करण्यात आले आहे.

बालवयातच शैक्षणिक क्षेत्रासोबत कला क्षेत्रातही उल्लेखनीय यश मिळवणाऱ्या अर्जुनीने आपल्या बहुआयामी गुणांद्वारे प्रेक्षकांच्या मनात वेगळे स्थान निर्माण केले आहे. या कार्यक्रमाला योगतज्ञ राजलक्ष्मी राव, रीना दत्तगुप्ता, जयश्री झा, अनुजा अय्यंगार, अक्युपंचर तज्ञ जायली तेरडे, ओम आय केअर ऑप्टिकलचे परेश तेरडे, ज्योत्स्ना चंदने, स्वानंद लाड, सुप्रसिद्ध भाऊ कोरडे मसालेचे मिलिंद कोरडे व मृणाल कोरडे, मेकअप आर्टिस्ट मानसी कोरडे, समाजसेवक व एन एस एस कन्सल्टन्सीचे एम.डी. सागर रोकडे आणि गोपाळ भोईर यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी अनाहत आरोग्य हॉलिस्टिक हिलिंग सेंटरच्या सायली कोरडे व शीतल वनगे यांनी बालकलाकार अर्जुनीचे मनापासून स्वागत केले. उद्घाटन प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी तिच्या कलागुणांचे आणि प्रतिभेचे मनःपूर्वक कौतुक केले.

## देशभक्तीचा जल्लोष: पाईट कनिष्ठ महाविद्यालयात क्रांती सप्ताह उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**. खेड,. पुणे**

(दि. १० ऑगस्ट २०२५): पाईट येथील कला, वाणिज्य व विज्ञान कनिष्ठ महाविद्यालयात २ ते ९ ऑगस्ट २०२५ या कालावधीत 'क्रांती सप्ताह' राष्ट्रभक्तीने भारलेल्या वातावरणात आणि विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागासह मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.\ या सप्ताहाची सुरुवात 'भारत छोडो आंदोलन दिना'च्या पार्श्वभूमीवर झाली. स्वातंत्र्य संग्रामातील क्रांतीकारकांच्या स्मृती जागवण्यासाठी विविध स्पर्धा व उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. निबंध लेखन, व्याख्याने, वक्तृत्व, पोस्टर स्पर्धा, घोषवाक्य लेखन, चित्रप्रदर्शन, देशभक्तीपर गीते आणि तिरंगा रॅली सह "आपण देशासाठी काय करू शकतो?" ही चित्रफीत दाखवून विविध उपक्रमांनी सप्ताह अधिक प्रभावी बनवला. विद्यार्थ्यांनी क्रांतीकारकांचे जीवनचरित्र, त्यांच्या त्यागमय कार्याचे महत्व आणि स्वातंत्र्यलढ्याचे महान अध्याय अत्यंत प्रभावीपणे सादर केले.



या सप्ताहाचे उद्घाटन महाविद्यालयाचे प्राचार्य असिर शेख यांच्या हस्ते करण्यात आले. आपल्या भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांना स्वातंत्र्याचा इतिहास समजून घेऊन त्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहन केले. क्रांती सप्ताहाचे यशस्वी आयोजन हे आयोजन समिती प्रमुख प्रा. हृषिकेश बेल्हेकर यांच्या नेतृत्वाखाली पार पडले. त्यांनी आयोजन समिती प्रमुख म्हणून संपूर्ण सप्ताहाचे नियोजन कुशलतेने सांभाळले. त्यांच्या सोबत प्रा. शुभांगी रौंधळ, प्रा. संदेश कोहिनकर, प्रा. सतिश बांबळे, प्रा. सुमित गायकवाड यांनी संयोजनात मोलाचे योगदान दिले. कार्यक्रमातील विविध उपक्रमांची रचना व अंमलबजावणी यामध्ये प्रा. वर्षा दिघे, प्रा. समिर इनामदार, प्रा. चेतन गुरव, प्रा. शोभा कलकुटगी, प्रा. संतोष केदार यांचे विशेष योगदान लाभले. कार्यालयीन लिपिक श्री. गोरक्ष रौंधळ यांच्यासह सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी क्रांती सप्ताहात उत्स्फूर्तपणे सहभाग घेतला. या सप्ताहातून विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रप्रेम, सामाजिक भान, ऐतिहासिक जाणीव आणि भारतीय स्वातंत्र्य संग्रामाबद्दल अभिमान निर्माण झाल्याचे मत जेष्ठ प्रा. सखाराम गिरी यांनी व्यक्त केले. संपूर्ण आठवडाभर महाविद्यालयात देशभक्तीचा जल्लोष आणि इतिहासाच्या तेजस्वी पावलांचा सन्मान अनुभवता आला.

# शूद्र ओबीसी आगरी कोळी बांधवांना न्याय का मिळत नाही?

माझ्या वयाची पस्तीस वर्षे देव न्याय देतो.या धर्मश्रद्धेवर विश्वास ठेवून गेली.या काळात जीवनाची जी स्वप्ने पाहिली त्यात कष्ट,कर्तव्य,प्रयत्न यांचे सातत्य होते. परंतु पाहिलेली स्वप्ने पूर्ण होत नाहीत.हा अनुभव होता.याचा हळू हळू परिणाम मनावर होत होता.उत्तम शिक्षण,शारीरिक,मानसिक योग्यता असूनही पूर्ण पगाराची शिक्षकाची नोकरी मला का मिळत नाही?. नोकरीच्या हक्कांसाठी संघर्ष सुरू असताना,झालेला अन्याय हा माझे नशीब आहे.प्रारब्ध आहे.पूर्व जन्मीचे पाप आहे.देवाच्या,धर्माच्या सेवेत मी कमी पडतोय.हिंदू मनाच्या सांत्वन पर अनेक उपदेश,मग मांत्रिक,ज्योतिष हे सारे मार्ग मी अनुभवले..योग्य उत्तर मिळत नव्हते.यातूनच माझ्यासारखा अन्याय इतर लोकावर होतोय.याची जाणीव,संवेदना जागी झाली.त्यांना न्याय देत असताना,उच्चवर्णीय लोकांचा माझ्यावर जीवघेणा हल्ला झाला.मग पोलिस स्टेशन,न्यायालय,पत्रकार यांच्या भेटी,न्यायासाठी झाल्या.देव धर्म नवस यांच्यापेक्षा लोकशाहीतील नेते,प्रशासन न्यायालये,मिडिया हे नवे पर्याय समोर आले.ग्रामीण भागातून आलेल्या धर्मश्रद्ध ओबीसी शूद्र तरुणासमोर लोकशाही ही देव धर्म यांच्यापेक्षा वेगळी व्यवस्था आहे.हे अनुभवातून समजू लागले. पुढील काळात आंबेडकरी चळवळीतील काही कार्यकर्ते मला भेटले.या अगोदर हिंदू म्हणून जे शूद्र ओबीसी मध्ये जगण्याचे तत्वद्न्यान असते.ते मी जगलोय.यात आजच्या संघ परिवाराचे मागील तीन पिढ्यांचे हिंदू संस्कार,माझ्या चिंचोटी अलिबाग गावातली ज्वलंत हिंदुत्वाची शिवसेना. सर्व धार्मिक नवस,सायास,राम,कृष्ण,हनुमान या देवतांचे सण,उत्सव,जत्रा याचे उच्चतम धर्म संस्कार सोबत होतेच. ज्या दिवशी आंबेडकरी विचारांचे लोक भेटले.त्यादिवशी मी नवे जग पाहिले.अगोदरच्या सर्व प्रथा नाकारून जीवनाच्या वाटेवर अतिशूद्र अवस्थेतून आम्हा शूद्र ओबीसी पेक्षा खात्रीचे,शाश्वत मतांचे, तर्क बुद्धीने जगणारे लोक हे माझ्यासाठी याच जगातले,पृथ्वीवरचे नवे आश्चर्य होते. ईश्वर,धर्म,देवळे,जत्रा यात्रा सण उत्सव यांच्या समोर पर्याय म्हणून आपण स्वतः माणूस आहोत. हा पर्याय मला डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या जीवन चरित्र आणि समग्र विचार साहित्याच्या अभ्यासातून मिळाला.मी शूद्र ओबीसी आगरी आहे म्हणजे काय? हिंदू धर्मातले माझे आजचे स्थान काय? या साऱ्या प्रश्नाची उत्तर मिळाली. माझ्या आई वडिलांची आर्थिक स्थिरता न्याय,पारिवारिक सुखाची स्वप्ने घेऊन शिक्षकी पेशा स्वीकारला होता.गरिबी विरोधी लढण्याचा तो एक नोकरीचा मार्ग होता.दोन नोकऱ्या १९९० ते २००५ या काळात केल्या.सोडाव्या लागल्या.यश नाही. यातील माझ्या चुका मी शोधल्या.परंतु माझ्यापेक्षा नोकरीतील वरिष्ठ,उच्चवर्णीय प्रशासक,शिक्षण व्यवस्था,पुढे लोकशाही लोकसेवक,प्रशासन,पोलिस,न्यायालये,समाज यातील शूद्र ओबीसी म्हणून माझ्यासमोर भक्कम तटबंदी प्रमाणे आडवे जाणारे संघटित लोक मला दिसू लागले.यातूनच माझी आगरी जात ओबीसी समाज आणि स्त्री शूद्र अतिशूद्र यांचे दुःख महात्मा जोतिबा फुले सावित्री माई फुले यांच्या विचारातून समजून घेतले. नवस,अगरबत्ती,धूप,फुले,सण उत्सव



यातील धर्म नक्की काय आहे? ही सारी कर्मकांडे करूनही तथागत बुद्धांना मानवी दुःखाचे कारण समजत नव्हते.तेव्हा त्यांनी दुःखाचे मूळ शोधताना केलेला प्रवास मी समजून घेतला.सोबत वास्तव वादी चार्वाक वाचला.जीवनात नवी चळवळ सुरू झाली.माझ्या जातीचे पुढारी नारायण नागू पाटील हे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी सागितलेल्या मार्गावर खोत सावकारी अर्थात उच्चवर्णीयाविरोधात का लढत होते?. मग लोकनेते दि बा पाटील,अड दत्ता पाटील यांचा जमीन मालकी,आरक्षण,राजकीय संघर्ष प्रत्यक्ष सहवासात अनुभवला.अर्थात छत्रपती शिवाजी महाराज,जोतिबा फुले,सावित्री माई,राजर्षी शाहू महाराज,डॉ.बाबासाहेब आंबेडकर,सर्व आगरी कोळी ओबीसी नेते यांचा न्यायासाठी अखंड संघर्ष सुरू आहे. मनुस्मृतीच्या संघटित व्यवस्थेत शूद्र ओबीसींना पूर्ण न्याय नाहीच.हजारो वर्षे स्त्री शूद्र अतिशूद्र या शोषित लोकांचा हा संघर्ष उच्च वर्णीय हिंदू ब्राह्मण क्षत्रिय वैश्य सुखात जगून पहात आहेत.ज्या दिवशी मी शूद्र ओबीसी म्हणून असलेली विषम अवस्था मी समजून घेतली.तेव्हा "अत्त दीप भव"या तत्वाने म्हणजे मीच माझ्या सुख दुःखास जबाबदार आहे.या न्यायाने पहिल्याच वर्षी मी माझ्या घर जमीन हक्कांचे स्वप्न पूर्ण केले.नोकरी सोडून,रस्त्यावर येऊन,एक वेळ विधानसभा,दोन वेळा लोकसभा लढलो,लोकांमध्ये जाऊन बोलू लागलो.लिहू लागलो.लढू लागलो. एकच जन्म परंतु दोन वेगळे अनुभव घेतले.एक गुलाम मानसिकतेच्या श्रद्धेत सुख मानून जगण्याच्या हिंदुत्वाचा! दुसरा जीवनाकडे प्रत्येक क्षण सजग ,सावधान पद्धतीने जगत निसर्ग न्यायाची क्रिया प्रतिक्रिया,सुख दुःख डोळस बुद्धीने जगण्याचा.जग सतत बदलते आहे.पूर्वीची म्हणजे २००५ ची स्थिती बदलू शकते.आज नवी स्थिती आहे.जग परिवर्तनशील आहे.हे बुद्ध सांगतात.दुसरीकडे आजचे शूद्र ओबीसींचे जीवन पूर्व जन्माचे पाप आहे.ते कधी या जन्मी बदलू शकत नाही.हे हिंदू स्थितीशील तत्वद्न्यान अगदी पुनर्जन्म,स्वर्ग,नर्क, चमत्कार आत्मा,भुते हे थोतांड आहे. हा अनुभव मी समजून घेतला. आज रात्रभर मी ज्या प्रश्नाने झोपलो नाही.त्या प्रश्नांमुळे हा लेख लिहिला. आमच्याकडे अत्यंत लोकप्रिय प्रभात पर्व चॅनलवर मी लोकांचे प्रश्न मांडले.लोक म्हणतात राजाराम पाटील आपण फक्त बोलता.प्रश्न सोडवत नाही.समोर कुणी बोलत नाही.मागे मात्र बोलतात.मला याचा राग नाही.हा प्रश्नच ओबीसी जीवनाचा प्रश्न आहे. २००५ नंतर मी लोकांच्या जमीन घरे जंगल समुद्र पाणी शिक्षण आरक्षण प्रश्नावर काम करतोय. अर्थात नवस,पूजा पद्धतीने नाही.तर नव्या लोकशाहीतील नेते,प्रशासन,पोलिस न्यायालये वकील,मोर्चे,प्रबोधन या मार्गावर अनेक युट्यूब चॅनल,वृत्तपत्र येथे बातम्या येतात.लोक मला बोलावतात. मी प्रत्यक्ष जागेवर जाऊन प्रश्न समजून घेतो.शासनाकडे अर्ज करतो.पाठ पुरावा करतो.अनेक वर्षे लोकांना न्याय मिळत नाही.पाच कोटी रुपये किमतीची जमीन लोकांना पाच रुपयांच्या किंवा पाच लाखांच्या न्यायालयातील दाव्याने हवी.शत्रू पन्नास लाख घेऊन न्याय खरेदी करतोय.मुळात मनुस्मृती नुसार त्यांना ही जमीन शूद्र ओबीसींना द्यायचीच नाही.याबद्दल आपण देशाची परिस्थिती पाहतोय. नोटबंदी कोरोना काळानंतर आर्थिक मंदी आहेच.परंतु लोकांच्या न्यायाला सरकारी अडथळे वाढलेत.कालच पुण्यातील मागास वर्गीय मुलींच्या पोलिस स्टेशन मधील अत्याचार प्रकरण पाहिले.कायद्याची चर्चा पाहिली. शिवसेना पक्ष हा शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरेंच्या मुलाचा उद्धवजींचाच,परंतु तो एकनाथ शिंदे याचा कसा? झाला आहे? ही सारी न्यायव्यवस्था सांगतेय.लोकांच्या डोळ्यांना दिसणारा न्याय नाकारला जातो.प्रत्यक्ष पुरावे आपला देश मानत नाही. पेहेलगावचे अतिरेकी आले कुठून ? या प्रश्नाचे उत्तर लोकसभेत विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांना मिळत नसेल.तर न्याय आहे कुठे?. धर्म श्रध्दा जपणाऱ्या हिंदुना या लोकशाहीत याचे उत्तर हवे असेल?. तर संविधानकार.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा नवा दृष्टिकोन,तर्क समजून घ्यावा लागेल.सामान्य माणूस हिंदू,मुस्लिम,ख्रिश्चन,पारशी, बौद्ध,जैन,ओबीसी,एससी एसटी यांना तो आंबेडकरी विचार आत्मसात करावा लागेल.या देशातील मनुस्मृती प्रणित धर्म व्यवस्थेला म्हणजेच ब्राह्मण क्षत्रिय वैश्य सत्ताधारी जातीना न्यायिक बुद्धी नाही.जागतिक कीर्तीच्या इंग्रज लोकांचे हे म्हणणे आहे. आम्हा ओबीसी एससी एसटी स्त्रिया यांच्या शोषणाचा धर्म इथे हजारो वर्षे होता.आज आहे.आम्ही लढलो नाही तर तो असाच राहील. आम्हाला न्याय न मिळण्याचे कारण लोक लोकसभा, राज्यसभा,विधानसभा,विधान परिषद, जिल्हाधिकारी,पोलिस,न्यायालये,रस्ते इथे लोक वेड्यासारखे शोधत आहेत.सारे उच्चवर्णीय विषमतेचा सुखाचा क्रूर,अमानुष आनंद घेत आहेत. अदानी, अंबानी विमानतळे,बंदरे,उद्योग,मुंबई सहज ताब्यत घेत आहेत.आम्ही आख्या आयुष्यात मुंबईत ३३० चौरस फुटांचे घर घेऊ शकत नाही.या "शूद्र" ओबीसी जीवनाचे प्रश्न समजून घेणे .ही आपली जबाबदारी आहे. भावा बहिणींना समजावून सांगा.एक बातमी,एक अर्ज एक मोर्चा,न्याय देत नाही.तुमचे स्वतःचे जुने ,देवभोळे जीवन बदलावे लागेल.निसर्ग न्याय,तर्क,बुद्धी,नवा वैद्न्यानिक विचार समजून घ्यावा लागेल.मुलांना जागतिक दर्जाचे शिक्षण द्या. स्त्री शूद्र अतिशूद्र यांच्या न्यायाचा संघर्ष २५०० वर्षे बुद्ध चार्वाक महावीर यांनी सुरू केला.छत्रपती शिवराय,फुले शाहू आंबेडकर यांनी चालविला.ओबीसी नेते लोकनेते दि बा पाटील यांनी चालविला.. न्यायासाठी संयम,पैसे,मानवी श्रम,नेतृत्व,प्रबोधन यांचा अखंड संघर्ष आहे.आपला शत्रू मोठा आहे. संघटित आहे.त्यात देव धर्म आणि ब्राह्मण क्षत्रिय वैश्य सगळी सत्ताकेंद्रे आहेत.आपल्याला न्याय देता देता मला.फार वाईट अनुभव आले.कुळ कायदा,सेझ,सिडको,मुंबई कोळीवाडा गावठाण हक्क यातील आपले सारे प्रयत्न आपल्या शत्रू समोर तोकडे पडतात.मला माहीत आहे .अनेक वर्षे लढून न्याय नाही.आम्ही मागास शूद्र आहोत. म्हणून गरीब आहोत. लढण्यासाठी पैसे,साधने,आमच्याकडे शत्रूच्या तुलनेत जवळ जवळ नाहीतच.शूद्रांना या देशात देव धर्म पुरोहित,क्षत्रिय,वैश्य न्याय नाकारतात. तुमच्यासारखीच गरिबी माझ्याकडे ही आहे.आपण कधी येऊन पाहू शकता. परंतु मी न्यायासाठी आग्रह कधी सोडला नाही. आज होय माझ्याकडे घर,परिवार आणि तुम्हा आम्हाला एक वेळ मिळेल एवढे अन्न आहे. निवारा आहे.आपण सोबत असाल तर आमच्या पूर्वजांनी दिलेला हा ओबीसी लढा पुढे नेऊ शकतो.याच क्षणी याच जन्मी तो पूर्ण करणे अवघड आहे.लढाई मोठी आहे.निसर्ग सोबत आहे.ओबीसींना न्याय का मिळत नाही? हे समजून घेतले?.तर मिळण्याचा मार्ग मिळेल. जगात दुःख आहे.दुःखाचे कारण शोधता येईल.ते कारण संपविले,तर दुःख समूळ संपेल.काही चुकले असेल,तर माफ करा.न्यायाच्या मार्गावर निराश होऊ नका."संघर्ष हेच माझे जीवन आहे." डॉ.बाबासाहेब आंबेडकर.

**दैनिक युवक आधार**
हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## प्रसिद्ध व्यापारी संजीव टेमकर यांचे अल्पशा आजाराने निधन

**दैनिक युवक आधार**
**नागोठणे वार्ताहर**



10 ऑगस्ट 2025 – येथील छत्रपती शिवाजी महाराज बाजार पेठेतील प्रसिद्ध व्यापारी संजिव शशिकांत टेमकर यांचे वयाच्या 58 व्या वर्षी गुरुवार 07 ऑगस्ट रोजी सकाळी 11.00 वाजण्याच्या सुमारास अल्पशा आजाराने निधन झाले. परिसर व विभागात ते संजय नाना नावाने परिचित असलेले तसेच शांत व प्रेमळ स्वभावाच्या संजीव टेमकर यांच्या पार्थिवावर येथील वैकुंठ स्मशान भूमीत सायंकाळी अंत्यसंकार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी राजश्री टेमकर,सिद्धार्थ टेमकर हा मुलगा, सुरभी टेमकर ही मुलगी तसेच प्रसिद्ध व्यापारी राजीव टेमकर व मिलिंद टेमकर हे दोन भाऊ,स्मिता पाटील ही विवाहित बहीण असा परिवार आहे. त्यांचे दशक्रिया विधी शनिवार 16 ऑगस्ट रोजी पाली – उद्धर येथे तर उत्तरकार्य सोमवार 18 ऑगस्ट रोजी त्यांच्या छत्रपती शिवाजी महाराज बाजार पेठेतील निवासस्थानी होणार असल्याची माहिती टेमकर कुटुंबियांनी दिली.

## स्वच्छ व सुंदर बस स्थानक अंतर्गत सिल्लोड बस स्थानकाची तपासणी

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :– स्वच्छ व सुंदर बसस्थानक २०२५ अंतर्गत सिल्लोड बसस्थानकाची सर्वांगीण तपासणी शुक्रवारी (दि८) रोजी अमरावती प्रादेशिक विभागाचे व्यवस्थापक राहुल पलंगे व वरिष्ठ संख्यागिक अधिकारी राजेश पवार यांनी केली व सिल्लोड बसस्थानकात असलेल्या सुखसोयी बाबत समाधान व्यक्त केले.

बसस्थानकात स्वच्छता,ओला व सुका कचरा विलीनीकरण, सार्वजनिक स्वच्छता करावयाची व्यवस्था, प्रवासी आसन व्यवस्था, कचरा संकलन डबे, गाड्यांचे वेळापत्रक, या सर्व बाबींची सुमारे तासभर तपासणी केली.

या वेळी त्यांच्या समवेत दैनिक देशोन्नती चे तालुका प्रतिनिधी संजय कुलकर्णी, पत्रकार गजानन मरकड व सामाजिक कार्यकर्ते अवचित कटारिया यांची प्रमुख उपस्थिती होती या वेळी १०० गुणांची अभिप्राय प्रश्नावली भरून घेण्यात आली.गत दोन वर्षांपासून राज्य शासनाने बाळासाहेब ठाकरे स्वच्छ अभियान अंतर्गत विविध बक्षीसं ठेवण्यात आली आहे.

सध्या सिल्लोड बसस्थानक परिसरात कॉंक्रीटीकरणाचे काम सुरू असून सोबतच वृक्षारोपण व वाहन व्यवस्था व्यवस्थित करण्याचा सुचना त्यांनी दिल्या.या वेळी आगारप्रमुख विजय काळवंडते, सहाय्यक वाहतूक अधिक्षक विकास चव्हाण, वाहतूक निरीक्षक संजय राठोड यांच्या सह राज्य परिवहन महामंडळाचे अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



## भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय आणि ज्येष्ठ नागरिक संघ उदघाटन

**दैनिक युवक आधार**
**रुपेश राजे करंजाडे प्रतिनिधी**

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक वाचनालय आणि ज्येष्ठ नागरिक संघ या वास्तूचे करंजाडे सेक्टर 4 टाटा पावर उद्यान मध्ये माननीय आमदार महेशजी बालदी साहेब आणि आमदार श्री विक्रांत दादा पाटील साहेब यांच्या हस्ते रविवार दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी उद्घाटन करण्यात आले सदर कार्यक्रमास करंजाडे मधील बौद्ध समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. बांधण्यात आलेल्या शेड साठी माननीय सरपंच श्री मंगेश दादा शेलार आणि भारतीय जनता पार्टी चे सर्व पदाधिकारी यांचे आयु. विक्रम रामचंद्र मोरे (भाजपा शहराध्यक्ष अ.जा. मोर्च्या) यांनी समाज बांधवांच्या वतीने आभार मानले. तसेच कार्यक्रमास अमित यादव, सुशांत गायकवाड, रोहन खेडेकर, श्याम कांबळे, आशुतोष यादव, बापूसो साबळे, वसंत सोनवणे, बाळासाहेब वाघमारे, वंदना खंडारे, नीता मोरे, विद्या पवार, सौ तेलंग तसेच संदेश पवार, चंद्रकांत पवार, सावंत साहेब आणि बौद्धजन पंचायत समिती शाखा क्रमांक 863 चे पदाधिकारी व जैष्ठ नागरिक व इतर मान्यवर उपस्थित होते.

## आदिवासी दिनानिमित्त शासकीय आदिवासी आश्रमशाळा ( महाराष्ट्र शासन) मुथाळणे ता जुन्नर येथे व्यसनमुक्ती जनजागृती व्याख्यान - दिलीप किसनराव आमले

**दैनिक युवक आधार**
**नेरुळ वार्ताहर**

*शासकीय आश्रम शाळा मुथाळणे (महाराष्ट्र शासन) ता जुन्नर जिल्हा पुणे येथे आदिवासी दिनानिमित्त आयोजित श्री दिलीप किसनराव आमले आपला माणूस सादरकर्ते व्यसनमुक्त जिवन काळाची गरज यामाध्यमातून विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्त जिवन याबाबत विशेष मार्गदर्शन संवाद यावेळी मुलांना शाळेय अभ्यासक्रम बाबतीत रस्ता सुरक्षा व व्यसनमुक्ती बाबतीत प्रश्न विचारले योग्य उत्तरे देणारे गुणवंत विद्यार्थ्यांचा शाळेय वस्तू हभप श्री किसन महाराज आमले यांच्या शुभहस्ते भेट वस्तू देऊन सर्व विद्यार्थीनी नियम पाळणे व्यसनापासून दूर रहावे आई वडील व शाळेत गुरू जनांचा आदर्श घ्यावा १४/१५ वर्षापासून खरी आपल्या जीवनात यशस्वी होण्यासाठी स्वतःमध्ये पात्रता स्वताच्या मेहनतीने आपले आयुष्य सुखाचे समाधानाचे भरभराटीचे आनंदी वातावरण निर्माण करायचे असेल तर फक्त आणि फक्त अभ्यासच (शिक्षण) आपल्याला यशस्वी वाटचाल करणेसाठी निवडलेला मार्ग आहे म्हणून वाईट गोष्टींच्या आजूबाजूला सुद्धा आपण फिरायचे नाही हा ठाम विश्वास विचार तुमच्या मनात निश्चित करुन चांगले गुण संपन्न करणे व चांगले शासकीय अधिकारी कर्मचारी आदर्श व्यवसाय आदर्श व्यक्तिमत्व घडणे हे तुमच्या वागणुकीत आहे जसे रस्त्यावर चालताना खड्डेच्या बाजुने चालतो तसेच जिवनाचा प्रवास आनंदित मार्गाने करावा यावेळी प्रमुख उपस्थिती हभप श्री किसन महाराज आमले संस्थापक संत गजानन महाराज मंदिर आमलेलेशिवार डिगोरे सौ संगितताई दिलीप आमले अध्यक्षा त्रिमूर्ती महिला मंडळ नवी मुंबई,कु अंकिता दिलीप आमले संचालिका अंकिता मोटार ट्रेनिंग स्कूल, श्री बाळासाहेब दरेकर सर मुख्याध्यापक, श्री निलेश वर्पे सर अधीक्षक शासकीय आश्रमशाळा मुथाळणे,आपला माणूस श्री दिलीप किसनराव आमले व्यसनमुक्ती जनजागृती तसेच शिक्षक शिक्षिका व शेकडो विद्यार्थी उपस्थित होते




# नवी मुंबईत जागतिक आदिवासी दिन उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

सालाबादप्रमाणे यंदाही आदिवासी सह्याद्री प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य, नवी मुंबई यांच्या वतीने "जागतिक आदिवासी दिन 2025" जल्लोषात साजरा करण्यात आला. कोपरखैरणे ते वाशी दरम्यान भव्य सांस्कृतिक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. या रॅलीत राज्याचे वनमंत्री व पालघरचे पालकमंत्री गणेश नाईक तसेच माजी खासदार डॉ. संजीव नाईक सहभागी झाले. दोन्ही नेत्यांनी उपस्थित सर्व बांधवांना आदिवासी दिनाच्या शुभेच्छा देत समाजाच्या हक्कांसाठी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्धार व्यक्त केला.रॅलीत मुंबई, मुंबई उपनगर, नवी मुंबई आणि ग्रामीण भागातील तरुण–तरुणींनी सादर केलेली पारंपरिक नृत्यं, लोकगीते आणि कलाप्रदर्शनांनी उपस्थितांचे मन जिंकले.

डॉ. विलास गवारी यांच्या "आदिवासी समाज : आजची आव्हाने आणि भविष्याची दिशा" या विषयावरील प्रेरणादायी भाषणातून समाजाच्या सांस्कृतिक वारशाचा, हक्कांचा आणि एकतेचा संदेश देण्यात आला.कार्यक्रमात गुणवंत विद्यार्थ्यांचा, क्रीडा क्षेत्रातील मानकरी खेळाडूंचा व समाजसेवकांचा सन्मान करण्यात आला. या प्रसंगी संजीव नाईक यांनी आदिवासी समाजाच्या सर्व मागण्या व प्रश्न सोडवण्यासाठी तसेच विकासासाठी सातत्याने प्रयत्न करण्याचे आश्वासन दिले. त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी, राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु व मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी समाजाला मिळणारा मान–सन्मान अधोरेखित केला.



या कार्यक्रमाला आदिवासी सह्याद्री प्रतिष्ठानचे अध्यक्ष व माजी नगरसेवक रमेश डोळे, माजी नगरसेविका राजश्रीताई कातकरी, जयश्रीताई ठाकूर, रंजनाताई वाडेकर, चंद्रकांत पांडे, डॉ. प्रफुल विशे, प्राचार्य संतोष भारमळ, विक्रीकर निरीक्षक विशाल पिचड, तसेच अनेक मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते व सरकारी विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## जिओच नेटवर्क अभावी बाळदी ग्रामस्थांना नाहक त्रास

### गावातील जिओ टॉवर बनले शोभेचे यंत्र

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी**



उमरखेड तालुक्यातील बाळदी या गावात रिलायन्स जिओचे नेटवर्क कमी झाल्यामुळे युजर्सना आपला फोन वापरता येत नाही. रिलायन्सच्या जिओचे सर्व्हर डाऊन झाल्यामुळे मोबाइल वापरकर्त्यांना नेटवर्क मिळत नाही आहे. त्यामुळे युजर्स तक्रार सोशल मीडियावर करत आहे. गावामध्ये सर्वात जास्त जिओचे युजर आहेत.गेल्या दहा दिवसापासून जिओचं नेटवर्क अत्यंत कमी आहे.तसेच गावामध्ये असलेला जिओ टावर हे फक्त नावालाच का रेंज कधी येणार अशी चर्चा गावामध्ये चालू आहे.काही जणाकडून मोबाईलला पूर्ण नेटवर्कच नाही अशी माहिती मिळत आहे. आज रक्षाबंधन असल्यामुळे अनेक लाडक्या बहिणी राखी बांधण्यासाठी गावात येत असतात अशा परिस्थितीत कोणाचाही फोन लागत नसल्याचं कळत आहे. मोबाईल नेटवर्कबाबत समस्या निर्माण होत असल्याने त्याचा फटका ग्राहकांना बसतो आहे. एकीकडे मोबाईल सेवांचे दर वाढत असताना त्या प्रमाणात सेवा मिळत नसल्याने ग्राहक हैराण झाले आहेत.

मोबाईलला कव्हरेज मिळत नसल्याच्या समस्येला प्रामुख्याने ग्राहकांना तोंड द्यावे लागत आहे. विविध कंपन्यांच्या ग्राहकांच्या तक्रारीवरून दिसून येते.ठराविक कालावधीसाठी मोबाईलचे नेटवर्क गायब होत असल्याचा अनेकांचा अनुभव आहे. मोबाईलला कव्हरेज नसल्याने अनेक वेळा फोनच लागत नाहीत. त्याचप्रमाणे सुरू असलेला फोन मध्येच बंद होऊन संपर्क तुटण्याचे प्रकारही होत आहेत. याशिवाय फोन सुरू असूनही एकमेकांचा आवाज व्यवस्थित ऐकू येत नाही, अशाही अनेक तक्रारी आहेत. त्याचप्रमाणे एकमेकांना संपर्क करू इच्छिणाऱ्या दोघांच्याही मोबाईल संचामध्ये नेटवर्क दाखवत असताना प्रत्यक्षात त्यांचा एकमेकांना फोन लागत नसल्याचाही काहींचा अनुभव आहे. मोबाईल संच केवळ फोन करण्यापूरताच मर्यादीत नसून, सध्या मोबाईल इंटरनेट वापरणाऱ्यांची संख्याही झपाटय़ाने वाढली आहे. त्यामुळे मोबाईल इंटरनेटच्या वापरातून केवळ करमणूकच नव्हे, तर व्यवसाय व कार्यालयीन कामेही केली जातात. नेटवर्कच्या समस्येमुळे काही प्रमाणात या सेवेवरही परिणाम होतो आहे. इंटरनेट सेवेचा वेग कमी झाल्याच्याही तक्रारी करण्यात येत आहेत. मोबाईल सेवा देणाऱ्या सर्वच कंपन्यांनी त्यांचे दर अधिक प्रमाणात वाढविले आहेत. त्यामुळे मोबाईल वापरणाऱ्या ग्राहकांना काही प्रमाणात फटका बसत असून मोबाईलची सेवा सुधारण्याची अपेक्षा ग्राहकांकडून करण्यात येत आहे.सध्या निर्माण होत असलेल्या समस्यांबाबत ग्राहकांकडून संताप व्यक्त करण्यात येत आहे.

अशावेळी जिओ सारख्या मोठ्या टेलिकॉम ऑपरेटर कंपनीचे नेटवर्क डाऊन झाल्यामुळे अनेकांना अडचणी उद्भवत आहेत.

# अकोला जिल्ह्यातून दोन आरोपींना अटक, ५ मोबाईल आणि रोकड हस्तगत करण्यात यश.

**दैनिक युवक आधार**
**उपजिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील**

वाशिमः वाशिम जिल्ह्यात अवैध धंदे आणि गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी पोलीस अधीक्षक अनुज तारे, अपर पोलीस अधीक्षक लता फड आणि सहायक पोलीस अधीक्षक नवदीप अग्रवाल यांच्या मार्गदर्शनाखाली वाशिम पोलीस सातत्याने काम करत आहेत. चोरी आणि घरफोडीच्या गुन्ह्यांचा छडा लावून गुन्हेगारांना पकडण्यासाठी पोलीस नेहमीच सतर्क असतात.

काल, दिनांक ८ ऑगस्ट २०२५ रोजी संध्याकाळी ६ ते ८ च्या दरम्यान वाशिम शहर आणि ग्रामीण भागात जबरी चोरीच्या ४ घटना घडल्या.



घटनेची माहिती मिळताच वाशिम शहर, वाशिम ग्रामीण, स्थानिक गुन्हे शाखा आणि उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांची पथके तात्काळ घटनास्थळी पोहोचली. फिर्यादींनी दिलेल्या माहितीनुसार, यामाहा आर १५ रेसर बाईकवरून आलेल्या तीन आरोपींनी चाकूचा धाक दाखवून पैसे आणि मोबाईल जबरदस्तीने चोरले होते.सर्व फिर्यादींनी आरोपींचे वर्णन सारखेच सांगितल्याने पोलिसांनी या गुन्ह्याची गंभीर दखल घेतली. तात्काळ पोलीस अधीक्षक आणि अपर पोलीस अधीक्षक यांनी वेगवेगळ्या टीम तयार करून आरोपींचा शोध घेण्याचे आदेश दिले. स्थानिक गुन्हे शाखेचे सपोनि योगेश धोत्रे, वाशिम ग्रामीणच्या सपोनि श्रीदेवी पाटील आणि वाशिम शहरचे सपोनि बाळासाहेब नाईक यांच्या नेतृत्वाखालील पथके आरोपींच्या शोधासाठी रवाना झाली.पोलिसांना मिळालेल्या गुप्त माहितीनुसार, आरोपी अकोला जिल्ह्यातील असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. या माहितीच्या आधारे बार्शिटाकळी तालुक्यातील सुकळी पैशाळी गावात पोलिसांनी धाव घेतली. तिथे पोनि धुमाळ यांच्या पथकाच्या मदतीने आरोपींचा शोध सुरू असताना, माहितीनुसार एक बाईक एका घरात उभी दिसली. पोलिसांनी घराला वेढा घालून घरात प्रवेश केला. या कारवाईदरम्यान एक आरोपी पळून जाण्यात यशस्वी झाला, तर दोन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले.अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे राजु तुळशराम कांबळे (रा. पंचशील नगर, वाशिम) आणि प्रसिक युवराज जाधव (रा. सुकळी पैशाळी, ता. बार्शिटाकळी, जि. अकोला) अशी आहेत. चौकशीदरम्यान त्यांनी सर्व गुन्ह्यांची कबुली दिली. पोलिसांनी त्यांच्याकडून चोरी केलेले ५ मोबाईल आणि रोख रक्कम जप्त केली आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि संतोष शेटे करत आहेत.या यशस्वी कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अनुज तारे यांच्यासह सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी तपास पथकाचे अभिनंदन केले आहे.

# रजनीकांत बोरेले यांचा पाच फळांनी 'वजन तुला', सन्मान व साडी वाटप सोहळा उत्साहात

### शेकडो महिला-पुरुषांची उपस्थिती; भाषणातून राजकीय पक्षांवर ताशेरे

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:- जितेंद्र खोडे**

**पांढरकवडा :-** मौजा दहेली (तांडा) येथे नव्याने निवडून आलेले कृषी उत्पन्न बाजार समितीचे अपक्ष संचालक, समाजसेवक, व्हिसल ब्लोअर आणि जिंदल पुरस्कार विजेते रजनीकांत डालूरामजी बोरेले यांचा पाच फळांनी 'वजन तुला', सत्कार आणि साडी वाटप सोहळा ९ ऑगस्ट रोजी दहेली तांडा येथील जगदंबा मंदिर प्रांगणात आतिष बाजीच्या गजरात पार पडला.सत्कार प्रसंगी शिवदास नाईक,शेंगु नाईक,पोलीस पाटिल,मुरलीधर जाधव,धनराज चव्हाण,संजय पवार,धनराज राठोड यांच्या हस्ते साळ,नारळ आणि पुष्पमाला अर्पण करून रजनीकांत बोरेले यांचा गौरव करण्यात आला. प्रमुख अतिथी म्हणून राजू चिरंजीलालजी बोरेले,गणेश सिंघानिया,वासुदेव राठोड,विक्रांत चंद्रकांत बोरेले यांचा ही सत्कार झाला.या वेळी पोलीस पाटील मुरलीधर जाधव यांनी बोरेले यांच्या सामाजिक कार्याचा उल्लेख करत, त्यांचा परिचय वेगळा करून देण्याची गरजच नसून त्यांचे कार्यामुळे त्यांना जिल्ह्यात ओळखत असल्याचे सांगितले.यानंतर एक तासाच्या भाषणात रजनीकांत बोरेले यांनी सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, चळवळी सह राजकीय घडामोडींवर भाष्य केले.त्यांनी राजकीय पक्ष, प्रशासन आणि भ्रष्ट प्रवृत्तीवर तीव्र स्वरूपात टीका करत, "पैशाच्या आणि दबावाच्या राजकारणातही प्रामाणिकपणा आणि संस्कार जिवंत आहेत, हे मतदारांनी अपक्ष म्हणून मला निवडून देऊन दाखवून दिले," सत्कारमूर्ती बोरेले पुढे म्हणाले की सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक चळवळीपासून ते रक्षा बंधना पर्यंत विचार मांडले. पण खरी 'धमाल' झाली ती राजकीय पक्षांवर ताशेरेबाजी करताना. राजकीय पक्ष आणि प्रशाशन यांच्यासाठी सामाजिक कार्यकर्ते म्हणजे दारू तस्कर,क्रिकेट सट्टेबाज,गुन्हेगार,वाळू माफिया आणि समाज कंटकीय व्यवसाय करणारे,मध्यस्थी करणारे दलाल आहेत.आमच्यासारखे आरटीआय कार्यकर्ते, व्हिसल ब्लोअर,सामाजिक कार्यकर्ते त्यांच्या साठी सामाजिक कार्यकर्ते नसून त्यांच्या डोळ्यात आम्ही खुपतात," असा थेट आरोप रजनीकांत बोरेले यांनी केला.सोहळ्यात केळ, सफरचंद, चिकू, द्राक्ष, डाळिंब या पाच फळांनी बोरेले यांची 'वजन तुला' झाली. मंदिरात भजन–आरतीनंतर महिलांनी राखी बांधूली त्या नंतर रजनीकांत बोरेले यांनी साडी वाटप केले या सोहळ्यास गावातील शेकडो महिला–पुरुषांनी उत्स्फूर्त हजेरी लावली.कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी आयोजक धरमसिंग राठोड, सुभाष राठोड,उमेश चव्हाण,बाबुलाल चव्हाण,रामराव राठोड,अरविंद राठोड,राजू नाईक,धनराज चव्हाण, रंगराव पवार,विक्रम राठोड,पंकज राठोड,गजू राठोड,सुभाष चव्हाण आणि समस्त गावकऱ्यांनी परिश्रम घेतले. विशेष म्हणजे पांढरकवडा कृषी उत्पन्न बाजार समिति च्या निवडणुकीत भाजपा प्रणीत पैनल च्या ऐकून १८ जगा पैकी एक ही जागा जिंकता आली नाही. तर कॉंग्रेस आणि एकनाथ शिंदे शिवसेना पैनल चे १८ जागा पैकी १७ जागा जिंकली परंतु भाजपा आणि कॉंग्रेस शिवसेना शिंदे या दोघांना माघे टाकत एकमेव अपक्ष संचालक रजनीकांत बोरेले यांनी स्वबळा निवडणुक जिंकून सहकार क्षेत्रात विक्रम नोंदविला आहे म्हणून त्यांचा अनेक ठिकाणी गौरव आणि वजन तुला साजरे करण्यात येत आहे वजन तुलाचा पण विक्रम यवतमाळ जिल्ह्यात इतके वजन तुला कोणाचेही झाले नाही.



## श्रीवर्धन तालुक्यातील आरावी समुद्र किनारी आढळला मृतदेह

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**


काल दिनांक ९/८/२०२५ रोजी श्रीवर्धन तालुक्यातील आरावी समुद्र किनारी एक मृतदेह आढळल्याची बातमी खारगाव ग्रामपंचायत सरपंच श्री. अमोल आत्माराम पुसाळकर यांनी श्रीवर्धन पोलिस ठाणे यांनी दिली, पॅन्टच्या खिशामधे मिळालेल्या आधारकार्ड वरून मृतदेहाची ओळख पटली असून सदर व्यक्तीचे नाव– सचिन काशिनाथ होडवे, वय वर्षे – ४३, राहणार– काशिनाथ होडवे २/३ मेरा भिका भारवाढ चाळ, त्रिमूर्ती मंदिर जवळ, हरसिद्धी माता मंदिर/टाटा पॉवर बोरिवली पूर्व येथील रहिवाशी आहे, मृतांच्या नातेवाईकांना याबाबत पोलिस ठाणे श्रीवर्धन येथून संपर्क झाला आहे सदर मृतदेहाचे शवविच्छेदन झाले नसून पूर्ण नातेवाईकांकडून ओळख पटल्यानंतर शवविच्छेदन करण्यात येणार आहे, पाण्याचा खोलीचा अंदाज नआल्यामुळे पाण्यात बुडून सदर व्यक्तीचा मृत्यू झाला असल्याचा प्राथमिक अंदाज पोलिसांनी दर्शविला असून, पुढील तपास उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती. गर्जे मॅडम, आणि पोलिस निरीक्षक श्री. उमेश पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली करीत आहेत.



# श्रीवर्धन नगरपालिकेचा ढसाळ कारभार

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

श्रीवर्धन नगरपालिकेकडून शहरामध्ये ढसाळ कारभार पहायला मिळत आहेत, अनेक विभागातील रस्ते , गटार, समुद्रावरील CCTV यांची पार दुरावस्था झाल्याची दिसत आहे, पावसाळ्या पूर्वीच्या कामाचे शून्य नियोजन झाले असून याचा त्रास मात्र नागरिकांना सहन करावा लागत आहे, शहरामध्ये जीवना आणि दांडा जेट्टी च काम फोरकॉन कंपनी कडून चालू असून अवजड वाहनांची सतत ये जा चालू असते त्यामुळे रस्त्याची दुरावस्था झाली असून गटाराजवळील पिचिंग काहीठिकाणी कोसळले आहेत यांची माहिती वारंवार नगरपालिकेतील संबंधित विभागास देऊन सुद्धा याकडे दुर्लक्ष केले जात असल्याचे दिसते , एक ठिकाणी तर रस्त्याला मधेच भागदाड पडले असून यावर सुद्धा उपाययोजना अजून केलेली दिसत नाही, अर्धा पावसाळा संपायला आला पण काही ठिकाणी गटाराचे काम सुद्धा अर्धवट असल्याचे पहायला मिळत आहे, रायगडच्या किनार पट्टीवर अनेक ठिकाणी अमली पदार्थ आढळून आले आहेत तरीही श्रीवर्धन समुद्र किनारी सुरक्षेसाठी लावलेली CCTV उपाययोजना राम भरोसे असल्याचे पहायला मिळत आहे या सगळ्या विकास कामाच्या मागे असणाऱ्या समस्या कोण आणि कधी सोडणार याकडे सामान्य नागरिकांचे लक्ष असून नगरपालिकेने याकडे जरा गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.



# "चाकांवरची जिद्द - उरणमध्ये पहिली दिव्यांग व्हीलचेअर रेस" संपन्न

**दैनिक युवक आधार**
**उरण रायगड प्रतिनिधी रणिता ठाकूर**

दिव्यांग बांधवांच्या अंगातील ताकद ही केवळ हातापायात नाही, तर ती त्यांच्या मनात, आत्म्यात, आणि जिद्दीत आहे. दिव्यांगत्व ही कमतरता नसून, ती एक वेगळी ओळख आहे, जी त्यांना इतरांपेक्षा खास बनवते. जीवनात किती वेळा पडतो हे महत्त्वाचं नाही, तर प्रत्येक वेळी उभं राहण्याची त्यांची तयारी हीच दिव्यांगांची खरी विजयकथा आहे. स्पर्धेत सहभागी होणं म्हणजे त्यांच्या मनातील तेज, कल्पना आणि विचार जगासमोर मांडणं. आणि जे लोक आपल्या स्वप्नांवर विश्वास ठेवतात, त्यांच्यासाठी अशक्य काहीच नसतं. सदर व्हीलचेअर स्पर्धा ही फक्त हालचालीचं साधन नाही, तर ती दिव्यांगांच्या स्वप्नांच रथ आहे. स्पर्धेत सहभागी होणं म्हणजे स्वतःच्या मर्यादांना आव्हान देणं आणि जगाला दाखवणं की जिद्दीपुढे कोणताही







अडथळा मोठा नसतो. व्हीलचेअर रेस ही फक्त वेगाचीच नाही, तर मनाच्या धैर्याची आणि आत्मविश्वासाची परीक्षा आहे. याचेच एक उत्तम उदाहरण उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी जगासमोर ठेवले आहे. द्रोनागिरी स्पोर्ट्स असोसिएशन तर्फे मागील 25 वर्षा पासुन स्पर्धा घेत आहेत. या वर्षी पहिल्यांदाच उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांनी '२५ व्या द्रोणागिरी वर्षा मॅरेथॉन २०२५' मध्ये व्हीलचेर रेसिंग स्पर्धेत सहभाग घेतला होता. द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन चे अध्यक्ष महादेव घरत यांच्या अध्यक्षतेखाली सदर स्पर्धा उरण तालुक्यामधील बोकडविरा - चारफाटा (एन. एम.एस.ई.झेड. मैदान), पेट्रोल पंप जवळ १०/०८/ २०२५ ला भरवण्यात आलेली होती. सदर व्हीलचेअर स्पर्धा पहिल्यांदाच भरवण्यात आलेली होती तरीही मर्यादा ओलांडणारी चाकं उरणच्या दिव्यांग बांधवांचा अनोखा पराक्रम दाखवणारी नक्कीच ठरली. सदर स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक - संदेश येशुदास राजगुरू,द्वितीय क्रमांक - मिल्टन ऑगस्टीन मिरंडा, तृतीय क्रमांक - गुलाम हुसेन काझी चौथा क्रमांक -महेश पाटील आणि पाचवा क्रमांक उमेश पाटील यांनी पटकवला.भर पावसात सदर दिव्यांग व्हीलचेअर रेसिंग स्पर्धा जोश पूर्ण वातावरणात पूर्णत्वास गेली. स्पर्धेत सहभागी झालेल्या दिव्यांग बांधवांना शाब्बासकीची थाप देण्याकरता पुष्पगुच्छ, प्रमाणपत्र आणि सन्मानचिन्ह देण्यात आले.स्पर्धेत सहभागी झालेल्या दिव्यांग बांधवांचे द्रोणागिरी स्पोर्ट असोसिएशनचे अध्यक्ष माधव घरत यांनी कौतुक केले.तसेच शाबासकीची थापही दिली. पुढील येणाऱ्या सर्व स्पर्धांमध्ये प्रत्येक दिव्यांगाने सहभागी व्हावे असे आव्हानही त्यांनी केले.

पहिल्यांदाच उरण तालुक्यातील दिव्यांग बांधवांना द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशन च्या २५ व्या 'वर्षा मॅरेथॉन' मध्ये सहभागी करून घेतल्याबद्दल उरण दिव्यांग सामाजिक संघटनेच्या सदस्यांनी आभार व्यक्त केले. त्याचबरोबर व्यासपीठावरील सर्व मान्यवरांनीही दिव्यांग बांधवांनी सदर स्पर्धेत उत्स्फूर्त प्रतिसाद दिल्याबद्दल त्यांचेही कौतुक करण्यात आले. या स्पर्धेमुळे उरणच्या दिव्यांगांमध्ये "धैर्याच्या चाकांवर -द्रोणागिरी स्पोर्ट्स असोसिएशनने होणार यापुढे प्रेरणादायी सुरुवात"

# नांदेड येथील क्रीडा संकुलाचा प्रश्न मार्गी लावा

## राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांची अजितदादांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**
**नांदेड प्रतिनिधी चंद्रशेखर वाघमारे पपु निवळीकर**

नांदेड । नांदेड जिल्ह्यातील क्रीडा क्षेत्राला आणि खेळाडूना बळ देण्यासाठी नांदेड येथे अत्याधुनिक क्रीडा संकुल उभारावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे नांदेड जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांच्याकडे केली आहे. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे आज नांदेड जिल्हा दौऱ्यावर आले असता जिल्हाध्यक्ष होटाळकर यांनी दादांची भेट घेऊन मागणीची निवेदन सादर केले. यावेळी आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, राष्ट्रवादीचे प्रदेश उपाध्यक्ष व्यंकटराव पाटील गोजेगावकर, माजी आमदार अविनाश घाटे, माजी आमदार तथा नांदेड महानगर अध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा, जिल्हा कार्याध्यक्ष माधव पावडे, प्रवीण पाटील चिखलीकर, जिल्हाध्यक्ष बाळासाहेब रावणगावकर यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. राज्यातील क्रीडा क्षेत्राला बळकटी देण्यासाठी आपल्या नेतृत्वाखाली घेण्यात आलेल्या निर्णयामुळे अनेक जिल्ह्यावर क्रीडा संकुलाची उभारणी होत आहे. यात नांदेड जिल्ह्यातील क्रीडाक्षेत्राला बळकटी मिळावी यांनी जिल्ह्यातील ग्रामीण भागातील खेळाडूनाही राज्यस्तरीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर आपला नावलौकिक करता यावा यासाठी नांदेडमध्ये क्रीडा संकुल उभारणीसाठी मंजुरी मिळाली होती. परंतु जमीन हस्तांतरित करण्यात आली नाही. नांदेड शहरालगत असलेल्या असर्जन कौठा भागातील 25 एकर जागेवर हे संकुल उभारण्यात यावे यासाठी जिल्हाधिकारी यांच्याकडून प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आला आहे. या प्रस्तावावर तातडीने कार्यवाही करून क्रीडा संकुल उभारणीसाठी जमीन हस्तांतरित करून क्रीडा संकुलाचा प्रश्न मार्गी लावावा अशी मागणी होटाळकर यांनी अजितदादांकडे केली आहे. या मागणीच्या अनुषंगाने बोलताना उपमुख्यमंत्री अजित दादा पवार म्हणाले की, बीड येथे नुकतेच क्रीडा संकुल मंजूर केले आहे. त्यामुळे नांदेड येथेही क्रीडा संकुल मंजूर होण्याच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्ट्या उपमुख्यमंत्री निर्णय घेतील असा विश्वास राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष शिवराज पाटील होटाळकर यांनी व्यक्त केला आहे.



# महाराष्ट्र स्वराज्य पक्षाची रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर

**दैनिक युवक आधार**
**मुंबई,(केतन भोज);**





महाराष्ट्र स्वराज्य पक्षप्रमुख छत्रपती संभाजीराजे महाराज यांच्या नेतृत्वाखाली स्वराज्य पक्षाचे नेते सरचिटणीस धनंजय भाऊ जाधव स्वराज्य पक्षाचे नेते उपाध्यक्ष अंकुश कदम बाबा यांच्या मार्गदर्शनाखाली रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.यावेळी अँड ओमकार विठ्ठल जाधव- रायगड जिल्हा युवक अध्यक्ष,अजित घाडगे - रायगड जिल्हा उपाध्यक्ष,अमित शिर्के - रायगड जिल्हा युवक सचिव,दिनेश काळंगे - रायगड जिल्हा युवक सहसचिव,मनोहर पाटील - रायगड जिल्हा युवक संघटक,सचिन माने - रायगड जिल्हा युवक उपसंघटक,ऋषिकेश घुले - रायगड जिल्हा युवक उपसंघटक इत्यादी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांची रायगड जिल्हा युवक कार्यकारिणी जाहीर करण्यात आली आहे.यावेळी सर्व नवनियुक्त पदाधिकारी यांचे मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी मनःपूर्वक अभिनंदन व पुढील कार्यास शुभेच्छा देत आपण हेवा वाटावा असे कार्य करून गाव तिथं शाखा घर तिथं स्वराज्य या संकल्पनेतून छत्रपती संभाजीराजे महाराज यांचे विचार व पक्षाचे कार्य घराघरात पोहचण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न कराल असा विश्वास आहे असे मत महाराष्ट्र स्वराज्य पक्ष मुंबई विभाग युवक अध्यक्ष संतोष कदम यांनी व्यक्त केले.

# पत्रकार व पोलिसांप्रती कृतज्ञता व्यक्त करत क्षत्रिय स्वर्णकार समाज महिला मंडळाच्या महिलांनी बांधल्या राख्या

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी:-जितेंद्र खोडे**

राळेगाव :---- बहिण भावाच्या नात्याची वीण घट्ट करणाऱ्या रक्षाबंधना निमित्त राळेगाव येथील क्षत्रिय स्वर्णकार समाज महिला मंडळाच्या वतीने दि. ९ जुलै २०२५ रोज शनिवारला पोलीस स्टेशन येथे पत्रकार व पोलीस बांधवांना राख्या बांधून कृतज्ञता व्यक्त केली आहे.रक्षाबंधन एक पवित्र सांस्कृतिक भावनिक अगदी प्रत्येकाच्या जिव्हाळ्याचा सण आहे बहिणीने भावा प्रति मंगल कामना करत राखी बांधावी





अनुभवाने रक्षणाचे वचन तिला द्यावे अशा गोड भावबंधात गुंफलेला हा सण या सणाच्या निमित्याने समाजाच्या रक्षणार्थ कायदा व सुव्यवस्था बाधित ठेवण्यासाठी अहोरात्र झटणाऱ्या पोलिसांना तसेच पत्रकार हा समाजासाठी चौथा आधारस्तंभ मानले जाते कारण ते लोकांना माहिती देऊन त्यांना जागरूक करतात आणि सत्य जनतेसमोर आणण्याचे काम करतात तसेच त्यांना वेळोवेळी बातमी संकलन करण्याचे काम करावे लागते अशा पत्रकार बांधवांना व पोलीस बांधवांना क्षत्रिय स्वर्णकार समाज महिला मंडळाचे अध्यक्षा तसेच प्रांत ट्रस्टी इ. ७१७ संतोषीताई वर्मा, सामाजिक कार्यकर्त्या भावनाताई खंगण,कु. गौरीताई वर्मा,कोदाने ताई, सुनिताताई उईके या महिलांनी राख्या बांधून कृतज्ञेची भावना व्यक्त केली यावेळी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक योगेशकुमार दंदे,पोहेका गोपाल वास्टर,नापोका रुपेश जाधव,पोहेका उल्हास कुरकुटे ,मपोका प्रतीक्षा तीतरमारे,पत्रकार संघटनेचे अध्यक्ष प्रकाश मेहता,महेश शेंडे,अशोक पिंपरे ,फिरोज लाखांनी,राष्ट्रपाल भोंगाडे,तसेच नगरसेवक बाळू धुमाळ व पोलीस बांधव उपस्थित होते.

# सुधाकरभाऊ घारे फाउंडेशन, कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेस यांचा पुढाकार..

**दैनिक युवक आधार**
**भिसेगाव - कर्जत**

" श्रावण महिना" हा महिला भगिनींच्या माहेरवासातील आनंदाचा आणि उत्साहाचा महिना. त्यांच्या आनंदात भर घालण्यासाठी " श्री सुधाकरभाऊ घारे फाउंडेशन व कर्जत तालुका राष्ट्रवादी महिला काँग्रेस " घेऊन आल्या आहेत " उत्सवाची पर्वणी आनंदाला गवसणी, महिला भगिनींसाठी आली श्रावण सरी" या समूह नृत्य कार्यक्रमास भरघोस बक्षिसे व मानाची पैठणी आणि नथ असा सुमधुर कार्यक्रमाचे आयोजन " समूहनृत्य स्पर्धा २०२५ ” बुधवार दिनांक १३ ऑगस्ट २०२५ दुपारी २ वाजता, रॉयल गार्डन - मुद्रे, कर्जत येथे
आयोजित केले आहे.
ही स्पर्धा कर्जत तालुक्यातील महिलांकरिता मर्यादित असून या स्पर्धेमध्ये लोकनृत्य, कोळीनृत्य, लावणीनृत्य, आदिवासी नृत्य इत्यादी समूह नृत्यांचा समावेश असणार आहे. नृत्यासाठी फक्त मराठी गीतांचा समावेश असावा. एका ग्रुपमध्ये कमीत कमी ८ तर जास्तीत जास्त १२ स्पर्धक महिला असाव्यात. प्रत्येक गटाला सादरीकरणासाठी १० मिनिटांचा अवधी दिला जाईल. नृत्यासाठी लागणारे वाद्यवृंद व इतर साहित्य हे स्पर्धकांनी स्वतः आणावेत.
परीक्षकांचा निर्णय अंतिम राहणार आहे.
या स्पर्धेत प्रथम बक्षीस - २२,२२२ /- रू., द्वितीय बक्षीस - १५,५५५/- रू., तृतीय बक्षीस ११,१११/- रु., चतुर्थ क्रमांक - ७,७७७/- रु., उत्तेजनार्थ – ५,५५५/- रू. व मानाची पैठणी आणि नथ तर उपस्थित महिलांना इतर खेळांमधून मिळणार १६ आकर्षक बक्षिसे, व स्पर्धेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक महिलेस मिळणार आकर्षक बक्षिस, असा बहारदार सरी समूहनृत्य स्पर्धा - २०२५ "
"त केले असून या कार्यक्रमास सर्व महिला भगिनींनी उपस्थित रहावे असे सांगण्यात आले आहे.

# भेंडखळगावचा हरीनाम सप्ताह सोहळा

## केवळ बघायचा नसून तो अनुभवायचा असतो

**दैनिक युवक आधार**
**महाराष्ट्र प्रतिनिधी प्रमुख/प्रदीप पाटील**

आषाढी एकादशी संपलकी वेध सुरु होतात ते “श्रावणमासी हर्ष मानसी” म्हणत श्रावण महिन्याचे कारण हिंदूसंस्कृतीत अनेक महत्वाचे सणघेऊन येणारा महिना म्हणजे श्रावण,व्रतवैकल्याचा महिना म्हणजे श्रावण, उरण तालुक्यात या महिन्यात गवागावांतील मंदिरात अखंडहरीनाम सप्ताहचा जल्लोष नारळी पौर्णिमेपासून कृष्णजन्मापर्यंत सुरु असयचा आज काळाच्या ओघात मंदिरांतून येणारा टाळमृदुंगा बरोबर ज्ञानेश्वर माउली आणि संत तुकाराम महाराज्यांच्या अभंगाचा आवाज लोप पावत चालला काही गावंतील मंदिरात तो त्याचवेळी सफेदवस्त्रांतील डोक्यावर गांधी टोपी घालून कपाळी केशरी गंधाचा टिळा लाऊन मंदिरांतील टाळमृदुंगाच्या गजरात मुखी “विठूचागजर हरीनामाचा झेंडा रोविला म्हणत रंगात रंगून गेलेल्या “आजोबा पासून नातवा पर्यंत” पिढ्यान पिढ्यांचा हा संगम पहाताना आपल्या डोळ्याचे पारणे फिटून जाते. हा संगम पुढे गोपळकला पर्यंत सुरु राहणार आहे.पूर्वजांनी लवलेल्या हरिनाम सप्ताहच्या इवल्याशा रोपाचा वटवृक्ष कधी झाला ते समजलेच नाही,अशीही 156 वर्षाची परंपरा जपत हा हरीनाम सप्ताह आजही तितक्याच जल्लोषात साजरा होतो हे संगणकीय युगांतील आश्चर्य आहे की पांडुरंगाच्या एका दिवसावर येऊन थांबला परंतु आजही उरण तालुक्यांतील “प्रती पंढरपूर’ समजल्या जाणाऱ्या भेंडखळ गावाने आपल्या पूर्वजांनी 1868 मध्ये सुरु केलेल्या याअखंड हरीनाम सप्ताहाची परंपरा एकापिढी कडुन दुसऱ्यापिढीकडे सोपवीत156 वर्षाची सांभाळी आहे. “अवघे गरजे पंढरपूर चालला हरीनामाचा गजर”म्हणत भेंडखळ गावात



कृ.प्रतिपदे पासूनते गोपाळकला पर्यंत हा हरीनाम सप्ताह सुरु असतो इंग्रजी महिन्यानुसार हा हरीनाम सप्ताह शनिवार दिंनाक 9 ऑगस्ट 2025 रोजी मराठी थिती नुसार कृ.प्रतिपदेस या हरीनाम सप्ताहचा शुभारंभ भेंडखळच्या श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात पहाटे श्रींच्या मूर्तीस विधीपूर्वक मंत्रघोषात अभिषेक करून काकड आरती करून करण्यात आला.जसा शिस्तबद्ध आषाढी- कार्तीकेचा पंढरपुरीचा शिस्तबद्धवारीचा सोहळा पाहिलकी मनाला सुखद आनंद वाटतो कृपाशीर्वादाने आजही ही परंपरा सुरु आहे, कारण “सुंदर ते ध्यान उभे विटेवरी|कर कटावरी ठेवोनिया|” अनेक शतके विटेवर उभी असणारी वीठूमाउली आजही एकात्मतेचा, शिस्तीचा श्रमदानाचा संदेश वारीच्या देत आहे.हीच परंपरा रायगड जिल्ह्यांतील उरण तालुक्यातील भेंडखळ गावाने जपली आहे म्हणूनच भेंडखळगावातील सुरु असणारा हा हरीनाम सप्ताह केवळ बघायचा नसून तो अनुभवायचा असतो

# विद्यार्थी कायदा सज्ञान असणे काळाची गरज -सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ढाकरे

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

सिल्लोड :- अन्वी (ता. सिल्लोड) येथील महात्मा गांधी विद्यालय येथे विद्यार्थ्यांमध्ये कायद्याबद्दल जागृता यावी म्हणून "सक्षम तू " या अभियानांतर्गत कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. या कार्यक्रमाचे मार्गदर्शक ग्रामीण पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक रवींद्र ठाकूर यांनी कायदेविषयक माहिती देऊन कायदा सज्ञान विद्यार्थी काळाची गरज असल्याचे सांगितले. सक्षम तू अभियाना अंतर्गत विद्यार्थ्यांनी मानसिक,शारीरिक,बौद्धिक सक्षम बनावे असे आवाहन केले. तर राजर्षी शाहू शिक्षण संस्थेचे सचिव प्रा. डॉ.राहुल पालोदकर यांनी विद्यार्थ्यांनी झालेल्या अन्यायाबद्दल, गैरवर्तुणुकीबद्दल सजग राहावे आणि पालक,शिक्षक यांच्याशी संपर्क साधून झालेल्या अन्यायाला वाचा फोडावी, असे आवाहन करून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी संस्था खंबीरपणे उभे राहील असे आश्वासन उपस्थित पालक व विद्यार्थ्यांना दिले





या कार्यक्रमात अन्वी-रहिमाबाद गावचे पोलीस पाटील विलास चिंचपुरे,रहिमाबाद केंद्राचे केंद्रप्रमुख शालिकराम राऊत,पोलीस कॉन्स्टेबल सचिन काळे, पंडित फुले,सतीश पाटील यांची प्रमुख उपस्थिती होती.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गोविंद गोरे, प्रास्ताविक विक्रम खाडे तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक प्रकाश कथार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सदानंद झाल्टे, अनिल तायडे, नारायण खेडकर, शरद काटकर, उमेश वावधने,रेखा मादनकर,सारिका शेवरे, गणेश ताठे, आबा गाढवे यांनी परिश्रम घेतले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती निमित्त रोशनगाव येथे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांच्या उपस्थितीत शांतता समितीची बैठक संपन्न

**दैनिक युवक आधार**
**धर्माबाद प्रतिनिधी : गिरमाजी सुर्यकार**

धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव येथे 26 ऑगस्ट रोजी साहित्यरत्न ,बहुजन नायक ,लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीच्या पार्श्वभूमीवर रोशनगाव येथे पोलिस स्टेशन च्या वतीने रविवारी दिनांक 10/8/2025 रोजी शांतता समितीच्या बैठकीचे रोशनगाव येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी उपस्थित नागरिकांनी विविध सूचनेचं पालन करणार असेही आश्वासन दिले.



**कायदा व सुव्यवस्था राखण्याचे शांतता समितीचे आवाहन**

धर्माबाद पोलीस स्टेशन चे प्रभारी अधिकारी सदाशिव भडीकर, पोलीस उपनिरीक्षक बसवंत मुत्तेपोड , बीट जमादार मठपती आप्पा , गुप्तचर विभागाचे गंगाधर होळगे ,यांच्या प्रमुख उपस्थितीत लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त शांतता समितीची बैठक घेण्यात आली. यावेळी रोशनगाव येथील जेष्ठ नागरिक बाभळी बंधारा कृती समिती अध्यक्ष नागोराव पाटील जाधव,जयंती मंडळाचे अध्यक्ष सहदेव मेडेवार,उपाध्यक्ष सचिन जगजेकर, मंडळाचे सदस्य,सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे, तंटामुक्ती अध्यक्ष माधवराव पाटील माळगे, युवा नेते सामाजिक कार्यकर्ते साईनाथ पाटील जाधव,ग्रा. प .सदस्य सिध्देश्वर पाटील शिवशटटे,

धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव हे शांततेचं गाव आहे. महापुरुषांचे विचार फॉलो करा. डी.जे. लावणे बंद करा , लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे कथा वाचन करा.- पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर

माधवराव पाटील शिवशटटे, अशोक पाटील माळगे, बाळासाहेब पाटील शिवशटटे, शेषेराव मेडेवार,गंगाप्रसाद गायकवाड, आडेलू मेडेवार, यांची उपस्थिती होती.लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे जयंती उत्सवादरम्यान कोणत्याही प्रकारची बाधा निर्माण होवू नये, कायदा व सुवस्थेचा प्रश्न निर्माण होवू नये याकरिता काय खबरदारी घ्यावी याचे मार्गदर्शन मा. पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर यांनी यावेळी केले. पोलिसांना सहकार्य करण्याचे आवाहन केले. कोणीही आक्षेपार्ह पोस्टरर्स लावणार नाही. घोषणा देणार नाही, अशा सूचना ही त्यांनी केल्या. धर्माबाद तालुक्यातील रोशनगाव गावातील सामाजिक सलोख्याची भावना कायम राहून धार्मिक एकोपा टिकावा याकरीता सर्व धर्मियांनी सहकार्य करावे. डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे आदर्श विचार लोकांनी अंगीकारावे अशी उपस्थितांना माहिती दिली. प्रसंगी सरपंच प्रतिनिधी शिवराज पाटील भंडगे यांनी ही रोशनगाव ची सामाजिक एकोप्याची परंपरा यापुढेही टिकवून ठेवून येणारे सर्व राष्ट्रीय सण एकात्मतेच्या भावनेतून व शांततेत पार पाडतील यासाठी सर्वांनी सहकार्य करण्याचे आवाहन केले. साईनाथ पाटील जाधव,शिवराज पाटील भडंगे, नागनाथ पाटील माळगे, समस्त गावकऱ्यांच्या वतीने सत्कार करण्यात आले.सभेला रोशनगाव जयंती मंडळाचे सदस्य, असंख्य नागरिक, आदी उपस्थित होते. लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांची जयंती सर्व समाजबांधव मोठ्या उत्साहात साजरी करतात. यानिमित्त मिरवणुकीचे आयोजन केले जाते. या महत्वपूर्ण दिवसाला कोणत्याही प्रकारचे गालबोट लागू नये यासाठी धर्माबाद पोलीस स्टेशनचे प्रभारी अधिकारी सदाशिव भडीकर यांनी आवश्यक त्या सूचना केल्या तसेच निघणाऱी मिरवणुक शांततेत निघेल. कुठेही कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही, असे सांगितले. नागरिकांनी सहकार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. जयंती मंडळाच्या वतीने पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सदाशिव भडीकर, उपनिरीक्षक बसवंत मुत्तेपोड, मठपती आप्पा, गंगाधर होळगे, यांचे सत्कार करण्यात आले.

## चौल नगरीत रक्षाबंधनानिमित्त अष्टविनायक मित्र मंडळ सोंडेपारची भव्य नारळ फोडी स्पर्धा जल्लोषात

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**

चौल – कोकण किनाऱ्यावरील ऐतिहासिक आणि पौराणिक नगरी चौल, जी शतकानुशतकांपासून समुद्री व्यापार, संस्कृती आणि मंदिरांच्या वास्तुकलेसाठी ओळखली जाते, तेथे रक्षाबंधनाच्या पवित्र पर्वानिमित्त अष्टविनायक मित्र मंडळ सोंडेपार, चौल यांच्या वतीने भव्य नारळ फोडी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.चौलचा इतिहास प्राचीन काळापर्यंत पोहोचतो. येथे गडग्यातला मारुती, प्राचीन शिवमंदिरे, तसेच पोर्तुगीजकालीन बांधकामे आजही उभी आहेत. अशा या धार्मिक आणि सांस्कृतिक वारशाच्या पाश्वभूमीवर झालेली नारळ फोडी स्पर्धा गावकऱ्यांसाठी आनंदाचा सोहळा ठरली.नारळ फोडाफोडी ही केवळ ताकद आणि कौशल्याचा कस लावणारी स्पर्धा नसून, श्रद्धा, एकता आणि परंपरेचे प्रतीक आहे. सोंडेपार गावातील लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनी उत्साहात सहभाग घेतला. मान्यवर, मंडळातील सदस्य आणि बाहेरील गावांतून आलेल्या रसिकांच्या उपस्थितीत स्पर्धा रंगतदार पार पडली.स्पर्धेतील प्रथम क्रमांक – विपुल ठाकूर, द्वितीय – अर्चित राऊत आणि तृतीय – रोहन पाटील यांचा सत्कार योगेश पाटील यांनी आपल्या वडिलांच्या स्मरणार्थ स्मृतीचिन्ह देऊन केला. कार्यक्रमात संदीप म्हात्रे आणि विशाल ठाकूर यांनी स्पर्धकांना प्रोत्साहन दिले.विशेष म्हणजे, या स्पर्धेत फुटलेले नारळ दुसऱ्या दिवशी गायचोळे हनुमान मंदिर (गडग्यातला मारुती) येथे भक्तिभावाने अर्पण करण्यात आले आणि त्याच नारळाचा प्रसाद महाप्रसादाच्या स्वरूपात जेवण बनवून गावातील व येणाऱ्या सर्व भाविकांना, नागरिकांना प्रेमपूर्वक वाटण्यात येतो.दरवर्षी प्रमाणे याही वर्षी सोंडेपार अष्टविनायक मित्र मंडळाने परंपरा, ऐक्य आणि सांस्कृतिक वारसा जपणारी ही अनोखी मेजवानी यशस्वीपणे आयोजित केली. रक्षाबंधनाच्या पवित्र दिवशी झालेल्या नारळ फोडी स्पर्धेने चौल नगरीत बंधुभाव, उत्साह आणि सांस्कृतिक ऐक्याची नवी ऊर्जा निर्माण केली.



# जागतिक आदिवासी दिन कार्यक्रम उत्साहात साजरा
## 9 ऑगस्ट ला भव्य मोटारसायकल रॅली

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी :-जितेंद्र खोडे**
**यवतमाळ - ०९ ऑगस्ट**

संयुक्त राष्ट्र घोषित जागतिक आदिवासी दिन कार्यक्रम जागतिक आदिवासी उत्सव समिती च्या वतीने सहकार भवन येथे घेण्यात आला.प्रथम सत्राचे आरोग्य शिबीराचे उद्घाटन डॉ.बाबा येलके यांच्या हस्ते करण्यात आले.यामध्ये डॉ.मधुकर मडावी,डॉ.अरविंद कुडमेथे,डॉ.अतुल येलके,डॉ.नरेश वेटे,डॉ.आकाश कुडमेथे,डॉ. चित्रलेखा कुडमेथे, डॉ. उमेश मडावी,डॉ.अमोल वेट्टी,डॉ. प्रफुल फुलकर,डॉ.दिपक नैताम,डॉ.मोहन गेडाम,डॉ.हर्षल येरकाडे,डॉ.किरण वेट्टी,डॉ.सायली कन्नाके,डॉ.विषाखा गेडाम,डॉ.मुकुंद सयाम यांनी तपासणी करण्यात आली.यामध्ये आदिवासी समाजातील डॉक्टरांनी सहभाग घेतला.दुसरे सत्राचे उद्घाटन आमदार बाळासाहेब मांगुळकर यांचे हस्ते करण्यात आले.प्रमुख वक्ते विकास मीना जिल्हाधिकारी यवतमाळ,डॉ प्रा.सुरज




धुर्वे उर्फ सुर्या बाली तर यावेळी अध्यक्षस्थानी गुलाबराव कुडमेथे राज्य उपाध्यक्ष ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन स्वागताध्यक्ष चंद्रशेखर मडावी प्रमुख पाहुणे माजी सामाजिक मंत्री अँड शिवाजीराव मोघे,मिनाक्षी वट्टी संचालिका आदिवासी विकास महामंडळ नाशिक,राजुभाऊ मडावी उपशिक्षणाधिकारी जि.प.यवतमाळ, मधुकर उईके केंद्रीय अध्यक्ष ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन,सुरेश कन्नाके केंद्रीय कार्याध्यक्ष ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन,डॉ मधुकर मडावी जिल्हाअध्यक्ष ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन, प्रल्हादराव सिडाम राज्य अध्यक्ष कोया पुनेम गोटुल समिती,प्रमोद घोडाम संस्थापक अध्यक्ष ट्रायबल फोरम,पवनकुमार आत्राम केंद्रीय सदस्य ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन,किशोर उईके राज्य सदस्य ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन,राजु चांदेकर अध्यक्ष उलगुलान संघटना,गुलाबराव मेश्राम अध्यक्ष कोया पुनेम गोटुल समिती,दिलीप शेडमाके पहांदि पारी कुपार लिंगो बहुउद्देशीय संस्था,प्रविण मडावी जिल्हा उपाध्यक्ष ऑल इंडिया आदिवासी एम्प्लॉइज फेडरेशन,तुषार आत्राम संचालक जि.प.कर्मचारी पतसंस्था,डॉ.सतीश कोडापे उपस्थित होते. स्वागतगीत पुंडलिक वर्मे,सुवर्णा कुडमेथे,प्रिया कंगाले यांनी सादर केले.यावेळी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी प्रास्ताविक प्रा.निनाद सुरपाम तर सुत्रसंचलन निशांत सिडाम तर आभार अरविंद मडावी यांनी मानले परिश्रमासाठी जागतिक आदिवासी उत्सव समिती सचिव दिलीप मसराम, उपाध्यक्ष शंकर कोटनाके,दत्ता मेश्राम, राहुल खंडाते,विलास कन्नाके,,शरद ऊईके,रमेश उईके,संजय मडावी,प्रकाश मडावी,अरुण पोयाप,गजानन कोटनाके,विजय गेडाम,अजय घोडाम,संजय मडावी, नरेश उईके, विनोद मडावी,भिमराव मरसकोल्हे,रवि धुर्वे,विजय पेंदाम, विनोद उईके,बाबाराव कुळसंगे, ज्ञानेश्वर उईके, लक्ष्मण कुळसंगे,अभिमन्यू धुर्वे,शरद उईके,प्रा गजानन कोवे,सुरेश कोडापे,बालु वट्टी,भुषन भलावी यांनी केले.असे प्रसिद्ध प्रमुख कृष्णा पुसनाके,भारत गेडाम यांनी कळविले आहे.

# कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत अवैध धंद्याला आला ऊत.(पोलिसांचे अर्थपूर्ण दुर्लक्ष.!)

**दैनिक युवक आधार**
**उप जिल्हा प्रतिनिधी वाशिम गजानन पवार पाटील.**

**कारंजाः-** तालुक्यातील पारवा कोहर.पोहा काकड शिवनी. चांधई. पांनगव्हाण. उकर्डा.येथे अवैध धंद्याला आला उत तसेच कारंजा ग्रामीण भागामध्ये ठिकठिकाणी मिळते देशी व विदेशी दारू. एवढेच नव्हे तर पोहा तसेच कारंजा ग्रामीण भागातील वरली मटक्याला कोणाचा आशीर्वाद ठाणेदारांचा की वरिष्ठ अधिकाऱ्यांचा. वाशिम जिल्ह्यातील कारंजा तालुक्यातील ग्रामीण पोलीस स्टेशन




अंतर्गत पोहा येथे मटका जुगाराचे प्रमाण प्रचंड वाढले असून दररोज या अवैध धध्यातून लक्षावधी रुपयाची उलाढाल होत असल्यामुळे स्थानिक ग्रामीण पोलीस स्टेशन तथा वरिष्ठ पोलीस अधिकारी कर्मचाऱ्यांमुळे दररोज

कारंजा ग्रामीण पोलीस स्टेशन अंतर्गत येणाऱ्या अवैध धंद्याला ठाणेदार प्रवीण शिंदे यांचा 101% टक्के पाठींबा असल्याची खुलेआम चर्चा कारंजा ग्रामीण भागात होत आहे.वाशिम जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक अनुज तारे कारंजा ग्रामीण पोलिसावर कारवाईचा चटका देतील का असे ही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

उखल पांढरे होत असल्याच्या चर्चा रंगत.आहेत हि बाब हेरून स्थानिक नागरिकाने येथे अवैध धंद्याचां मोठा बाजार मांडलेला आहे.पंचक्रोशीतील नागरिकांच्या घामाचा पैसा बेकायदेशीर धंद्याच्या माध्यमातून ओरबाडून घेणाऱ्या ह्या अवैध धंद्याच्या मालकाला स्थानिक ग्रामीण पोलीस कर्मचाऱ्यांचे अर्थपूर्ण सहकार्य असल्याशिवाय शक्य नसल्याचे बोलले जात आहे.असून या भागातील नागरिकांच्या जीवनात वादळ निर्माण करणारे असले अवैध धंदे बंद करण्यासाठी वरिष्ठ पोलीस प्रशासनाने लक्ष घालण्याची मागणी सामान्य जनतेत होत आहे.

# रक्षाबंधनानिमित्त बालिका पंचायतीचा आगळावेगळा उपक्रम

**दैनिक युवक आधार**
**.तालूका प्रतिनिधी महादेव उप्पे**

येरगी बालिका पंचायत ला ओवाळणी तून मिळालेल्या १९ हजार ४०० रुपयांचे शैक्षणिक साहित्य जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना देणार. देगलूर( दि.११) रक्षाबंधनानिमित्त तालुक्यातील चालुक्य कालीन नगरी येरगी येथे बालिका पंचायत राज समितीच्या वतीने रक्षाबंधनाचा सार्वजनिक कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून मरखेल पोलीस स्थानकाचे पोलीस निरीक्षक आर.एम.हुंडेकर हे होते तर कार्यक्रमाच्या अध्यक्ष स्थानी सरपंच संतोष पाटील यांची उपस्थिती होते. यावेळी गावातील मारोती मंदिर येथे बालिका पंचायत द्वारा आयोजित सार्वजनिक रक्षाबंधन कार्यक्रमात गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.यावेळी प्रमुख पाहुणे पोलीस निरीक्षक आर.एम. हुंडेकर यांनी बालिका पंचायत राज चे कौतुक करत गावातील विकास कामांची प्रशंसा केली.बालिका पंचायत राज कडून घेतलेल्या दारू बंदी,हुंडा बंदी आदी महत्वाच्या निर्णयावर बोलताना म्हणाले की गावात या विरोधात कोणी वागत असेल,कोणी दारू पित असेल किंवा विकत असेल तर त्याची गय न करता त्यांच्यावर कायदेशीर कार्यवाही केली जाईल.दारूबंदीचा निर्णय अतिशय स्तुत्य असून यावर होणारा खर्च



आपल्या परिवाराच्या प्रगती साठी वापरावा असे ते म्हणाले.बालिका पंचायत राज समितीच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी उपस्थितांना राख्या बांधून त्यांचे औक्षण केले.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष सरपंच संतोष पाटील येरगीकर,प्रमुख मार्गदर्शक पोलीस निरीक्षक आर.एम.हुंडेकर,बिट जमादार संभाजी पाटील,मुख्याध्यापक ईश्वर वाडीकर,हणमंत थावरे,ग्रामपंचायत सदस्य विश्वनाथ बागेवार,अशोक बरसमवार,अशोक वाघमारे,पुंडलिक वाघमारे,सुरेश सोमवार,तंटामुक्त अध्यक्ष सायलू कांबळे,शालेय शिक्षण समिती अध्यक्ष गजानन भोकसखेड,इरवंत काळीगवार,सर्व शिक्षक,बालिका पंचायत राज समितीचे सरपंच अंजली वाघमारे,उपसरपंच पुनम सुर्यवंशी,ग्रामसेवक महादेव दाणेवार, पोलिस पाटील अनिता बागेवार, तंटामुक्त अध्यक्ष शिवकांत भुरळे, ग्रामपंचायत सदस्य रूद्राणी चैडके, महादेव कुंचगे,रितीका चिटकुलवार,आश्विनी लोहार,मोनीका माळगे,रुक्मिणी भुरळे,आजी माजी सर्व पदाधिकारी कार्यक्रमास उपस्थित असलेल्या प्रत्येकाने आपापल्या परीने ओवाळणी दिली. यातून तब्बल एकोनीस हजार चारशे रुपये जमले आहेत.बालिका पंचायत या एकोनीस हजार चारशे रुपयांचे शैक्षणिक साहित्य घेऊन गावातील शाळेला देणार आहे.यामुळे गावातील विद्यार्थ्यांना त्याचा उपयोग होईल. रक्षाबंधन निमित्त बालिका पंचायत राज समिती व ग्रामपंचायत कार्यालय येरगीच्या वतीने आयोजित सार्वजनिक रक्षाबंधन कार्यक्रमाचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

# प्रबोधन विद्यालय आंबाठा येथे जागतिक आदिवासी दिवस उत्साहात साजरा

**दैनिक युवक आधार**
**राजेंद्र टोपले, सुरगाणा**

" जागतिक आदिवासी दिन २०२५" प्रबोधन विद्यालय आंबाठा ता.सुरगाणा या शाळेत मोठ्या आनंदात साजरा करण्यात आला. आदिवासी समाजाला आधार देणारी, आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन पुरस्कृत होती.फाऊंडेशनचे सदस्य,व प्रबोधन विद्यालयाचे शिक्षक श्री.रामभाऊ गावित सर यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. परशराम पाडवी सर, आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन चे वरीष्ठ सल्लागार हे होते. तर प्रमुख पाहुणे प्रबोधन विद्यालयाचे माजी मुख्याध्यापक फादर - अनाक्लीट फर्नांडिस होते. मान्यवरांमध्ये स्टीम चे फादर पिंटो व त्यांची टिम. व शाळेच्या मुख्याध्यापिका सिस्टर थेरेसा वसावा होत्या. प्रबोधन विद्यालयाचे इ.८वी ते१० वी पर्यंतच्या १४ सामुहिक नृत्य व १२ वैयक्तिक नृत्य सादरीकरण करण्यात आले. त्यापैकी सामुहिक नृत्य यांमध्ये इ. ८वी ब तुकडीच्या मुलींनी बाजी मारत प्रथम क्रमांक पटकावला.तर वैयक्तिक नृत्य मध्ये इ.८ वी अ तुकडीची कुमारी.कशिस गावित. हिने प्रथम क्रमांक पटकावला. प्रथम, द्वितीय, तृतीय क्रमांक पटकावणाऱ्या गट व विद्यार्थ्यांना आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन कडून स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. सर्व




बक्षिसे व प्रमाणपत्र हे आदिवासी आधार मैत्री फाऊंडेशन चे अध्यक्ष श्री.रतन धुम यांच्या मार्गदर्शनाखाली फाऊंडेशन कडून देण्यात आली.

अध्यक्षीय भाषणात श्री.पाडवी सरांनी बहुमूल्य मार्गदर्शन करताना सांगितले की,आमची फाऊंडेशन जिल्ह्यातील आदिवासी बहुल तालुक्यांत नैसर्गिक आपत्तीत ग्रस्त कुटुंबाला आर्थिक हातभार लावत आधार देते. आदिवासी विद्यार्थ्यांना कला गुणांना वाव मिळावा म्हणून असे उपक्रम करत आहे.विद्यार्थांना शैक्षणिक साहित्य देऊन प्रोत्साहन देते.असे अनेक उदाहरणे दिली. आदिवासी देव-देवतांची यथोचित माहिती दिली.आपल्या वैयक्तिक जीवनातील प्रसंग व्यतीत केले.शिवाय फाऊंडेशन मध्ये जवळपास ४०% सदस्य हे प्रबोधन विद्यालयाचे माजी विद्यार्थी आहेत. श्री पाडवी सरांनी शालेय जीवनात प्रबोधनाच्या आठवणींना उजाळा दिला. प्रमुख पाहुणे फादर. फर्नांडिस म्हणाले की, आदिवासी संस्कृतीचे जतन करून संस्कृती टीकवली पाहिजे.सिस्टर थेरेसा वसावा यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करत शाबासकीची थाप दिली.व नियोजक श्री.गावित सर यांचे कौतुक केले. कार्यक्रमाचे सूत्र संचालन कुमारी. रोहीणी देशमुख इ.१०वी. हिने केले. तर सदगीर सर यांनी आभार मानले.

# कशेळे येथे भव्य आदिवासी भवनाचे भूमिपूजन – आदिवासी समाजाची ताकद अधोरेखित

## २८८ आमदारांपैकी आपल्या मतदारसंघासाठी सर्वात जास्त निधी आणणारा आमदार म्हणजे महेंद्र थोरवे .... खा. श्रीरंग आप्पा बारणे.

### आदिवासी समाज माझी ताकद आहे - आदिवासी भवनाच्या माध्यमातून हि ताकद नव्याने जगासमोर येणार - आ. महेंद्र थोरवे

**दैनिक युवक आधार**
**कशेळे । ९ ऑगस्ट २०२५:-**
९ ऑगस्ट २०२५ जागतिक आदिवासी दिनाच्या औचित्याने कशेळे येथे १.५० कोटी रुपयांच्या निधीतून उभारण्यात येणाऱ्या भव्य आदिवासी भवनाचे भूमिपूजन मावळ लोकसभा मतदारसंघाचे खासदार श्रीरंग आप्पा बारणे आणि कर्जत खालापूर मतदारसंघाचे कार्यसम्राटआमदार महेंद्र थोरवे यांच्या प्रमुख उपस्थितीत पार पडले. हा सोहळा ऐतिहासिक ठरला असून हजारोंच्या संख्येने जमलेल्या आदिवासी बांधवांनी पारंपरिक नृत्यप्रकार, गाणी आणि वादनाद्वारे आपली समृद्ध संस्कृती सादर केली. कर्जत तालुका हा आदिवासी बहुल भाग आहे. येथे आदिवासी समाजाने शतकानुशतकं आपली संस्कृती, परंपरा आणि जीवनशैली जपत आधुनिकतेच्या प्रवाहात पाऊल टाकले आहे. शासनानेही त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. या पार्श्वभूमीवर आमदार महेंद्र थोरवे यांनी आदिवासी समाजासाठी भव्य भवन उभारण्याचे स्वप्न पाहिले होते. आज त्या स्वप्नाला मूर्त रूप मिळाले. या कार्यक्रम प्रसंगी खासदार श्रीरंग बारणे यांनी आदिवासी समाजाच्या एकजुटीचे कौतुक केले.आजपर्यंत मतदारसंघा साठी सर्वात जास्त रेकॉर्डब्रेक निधी आणणारे आमदार म्हणजे महेंद्र थोरवे आहेत. ज्या आदिवासी समाजाने त्यांचं नेतृत्व पुन्हा एकदा स्वीकारलं त्या आदिवासी समाजाच्या मदतीची जाण ठेऊन आमदार महेंद्र थोरवे ह्यांनी एक ऐतिहासिक पाऊल आदिवासी



समाजासाठी उचललं आहे. भविष्यात निर्माण होणाऱ्या आदिवासी भवनातून समाजातील एकोपा कायम राहील आणि आदिवासी संस्कृती ठळकपणे जगासमोर येईल. आजची ही प्रचंड उपस्थिती आदिवासी समाजाची ताकद स्पष्टपणे दाखवते. भविष्यात निर्माण होणारे आदिवासी भवन हे केवळ इमारत नसून सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि समाजातील एकोप्याचे प्रतीक ठरेल," असे ते म्हणाले. या प्रसंगी बोलताना आमदार महेंद्र थोरवे यांनी "आदिवासी समाज माझी ताकद आहे. मला पुन्हा एकदा आमदार बनवण्यात आदिवासी समाजाचा मोठा वाटा आहे. आदिवासी भवन हे आमच्यासाठी मंदिरासारखे आहे. त्यांच्या संस्कृतीचा आणि एकोप्याचा गौरव जगासमोर यावा असे आमचे प्रयत्न असून त्यांच्या हक्कांसाठी आणि प्रगतीसाठी हे पाऊल उचलले आहे. हा कार्यक्रम राजकारणापलीकडचा असून समाजाच्या बळकटीकरणासाठी आहे. आदिवासी समाजाने आपली हजारो वर्ष जुनी संस्कृती जपत शिक्षण, क्रीडा, कला आणि प्रशासन या सर्वच क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती साधली आहे. तरीही त्यांच्या सांस्कृतिक वारशाचे संवर्धन आणि भावी पिढ्यांना त्याची ओळख करून देण्यासाठी एक स्थायी सांस्कृतिक केंद्राची गरज होती. कशेळे येथे उभारले जाणारे हे आदिवासी भवन त्या गरजेची पूर्तता करेल. या भवनात विविध सांस्कृतिक कार्यक्रम, परंपरांचे जतन, समाज बैठका आणि शैक्षणिक उपक्रम राबवले जातील. त्यामुळे समाजातील ऐक्य अधिक दृढ होऊन आदिवासी संस्कृती जगासमोर ठळकपणे येईल. या भव्य भूमिपूजन सोहळ्याने केवळ एक विकास प्रकल्पाची सुरुवात झाली नाही, तर आदिवासी समाजाच्या अभिमान, ऐक्य आणि प्रगतीच्या नव्या पर्वालाही प्रारंभ झाला आहे. कर्जत तालुक्यातील आदिवासी संस्कृती आता नव्या उंचीवर झेप घेणार याचा सार्थ अभिमान सर्वांना वाटत आहे. ह्या कार्यक्रमासाठी खासदार श्रीरंग आप्पा बारणे , आमदार महेंद्र थोरवे , मा.सभापती मनोहरशेठ थोरवे, जिल्हाप्रमुख संतोष शेठ भोईर , उपजिल्हाप्रमुख भाई गायकर , जिल्हा संघटक संभाजी जगताप , तालुकाप्रमुख सुदाम पवाळी ,शिवराम बदे, अमोल पाटील , भास्कर दिसले, सुरेश टोकरे ,युवासेना रायगड जिल्हाध्यक्ष प्रसाद थोरवे , मा. नगरसेवक संकेत भासे ,तानाजी मते , गजानन पेमारे , सरपंच पिंपरकर , आदिवासी समाजाचे परशुराम दरवडा , मनोहर कारोटे , भगवान भगत , उषा पारधी , जयवंती हिंदोळा ह्यांच्यासह सर्वपक्षीय आदिवासी समाजाचे नेते आणि आदिवासी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

---

# वाहिरा येथील अखंड हरीनाम साप्ताहाची मंहणत दत्तगिरी महाराज यांच्या कीर्तनणे झाली सांगता

**दैनिक युवक आधार**
**बीड आष्टी प्रतिनिधी मारुती सत्रे**
आष्टी तालुक्यातील वहिरा येथे गेली ४४ वर्षा पासून चालू असलेला अखंड हरिणाम सप्ताह, व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व योगसंग्राम पारायण सोहळा, ब्राह्माण लिन माणिकगिरी महाराज यांचे उत्तर अधिकारी महंत मठाधिपती दत्तगिरी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली, वहिरा येथे चालू होता, या साप्ताहाची सांगता मंहणत दतगिरी महाराज यांच्या कीर्तनणे सांगता झाली. मेहबूब भाई शेख, राम खाडे, युवा नेते जयदत्त भैय्या धस, सतीश आबा शिंदे, जब्बर महाराज, सुनील नाथ, आ.आमोलराजे निंबाळकर खासदार धाराशिव, संसद भवन सदस्य दिल्ली, यशवंत भीमराव डांगे साहेब(अहिल्यानगर महानगर पालिका आयुक्त)
अड. हनुमंतराव थोरवे, अड.मधुकर झांजे, प्रा. दादासाहेब झांजे, प्रा. सीताम झांजे
वहिरा व पंचक्रोशीतील, पारोडी, निमगाव भोडखा, खुंटेफळ, सोलापूरवाडी, वहिरा, घुमरी, पिंपरी, बाळेवाडी, हतोळण, पुंडी, घोगडेवाडी, खरडगव्हाण, काकडवाडी, पिंपळा, पिंपळगावदाणी, मेहकरी, व पंचक्रोरोशीतील, सर्व गावांमधून भाविक भक्त , मोठ्या संखेने उपस्थित असतात.
या कीर्तनचा कारेक्रम गायक, वादक, व टाळकरी यांच्या साथीने भक्तीमय वातावरणात पार पडला,



महाराजांनी कीर्तनतुन कृष्ण लीला सांगून सर्व श्रोत्यांना मंत्र मुग्ध केले, व शेवटी काळी वस्ती व भावरा वस्ती यांची महा पंगत झाली व कारेक्रमाचा शेवट झाला.

---

# पाकिस्तानची विंडीजवर सरशी

## पहिल्या एकदिवसीय सामन्यात ५ विकेट राखून बाजी

**तारौबा :** हसन नवाझने नाबाद ६३ धावा जमवताना निर्णायक क्षणी केलेल्या फटकेबाजीच्या बळावर पाकिस्तानने वेस्ट इंडिजला ५ विकेट राखून धूळ चारत मालिकेतील पहिला एकदिवसीय सामना खिशात घातला.

यजमानांनी दिलेल्या २८१ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना पाकिस्तानने ७ चेंडू राखून २८४ धावांवर ५ फलंदाज बाद असे विजयी लक्ष्य गाठले. पाकिस्तानचा कर्णधार मोहम्मद रिझवानने ५३ धावांची भर घातली.

सामन्याच्या सुरुवातीला फिरकीपटूंनी चांगली कामगिरी केली. परंतु दव पडल्यावर त्यांच्याविरुद्ध फलंदाजी करणे सोपे झाले, असे नवाझ सामन्यानंतर म्हणाला. या सामन्यात नाणेफेकीचा कौल महत्त्वाचा होता. अशा परिस्थितीत फलंदाजी करणे कठीण होते. आम्ही काही धावा कमी केल्या. सामन्याच्या शेवटच्या टप्प्यात आमच्या गोलंदाजांनी चांगली कामगिरी केली. मधल्या षटकांत अधिक धावा काढायला हव्या होत्या, असे होप म्हणाला.



### आफ्रिदीच्या विकेटचा चौकार

वेस्ट इंडिजच्या इविन लेविस, कर्णधार शाई होप आणि रोस्टन चेस या तीन फलंदाजांनी अर्धशतके झळकावली. पाकिस्तानचा शाहीन शहा आफ्रिदी काहीसा महागडा ठरला. परंतु त्याने ४ महत्त्वाचे विकेट मिळवले. त्याने ८ षटकांत ५१ धावा मोजत ४ फलंदाजांना आपल्या सापळ्यात अडकवले. वेगवान गोलंदाज नसीम शहाने ५५ धावा देत ३ बळी मिळवले.

---

# ऑस्ट्रेलिया महिला ‘अ’ संघाकडून भारताचा धुव्वा

## मालिकेत २-० ने विजयी आघाडी

**मॅके :** वेगवान गोलंदाज किम गर्थच्या शानदार गोलंदाजीच्या बळावर ऑस्ट्रेलिया महिला ‘अ’ संघाने भारत महिला ‘अ’ संघाला ११४ धावांनी धूळ चारत मैत्रीपूर्ण टी-२० सामन्यांच्या मालिकेत २-० ने विजयी आघाडी घेतली.

मालिकेतील दुसऱ्या सामन्यात शनिवारी भारताने नाणेफेकीचा कौल जिंकत प्रथम क्षेत्ररक्षण करण्याचा निर्णय घेतला. ॲलिसा हेलीने ४४ चेंडूंत ७० धावा चोपत ऑस्ट्रेलियाला निर्धारित २० षटकांत ४ बाद १८७ धावांचा डोंगर उभारून दिला. तिने आपल्या खेळीत १२ चौकार लगावले.

प्रत्युत्तरार्थ डावखुरी फिरकीपटू राधा यादवच्या नेतृत्वाखाली फलंदाजीला आलेल्या भारत महिला ‘अ’ संघाचा डाव १५.१ षटकांत ७३ धावांवर आटोपला.

हेली आणि ताहलिया विल्सन (३५ चेंडूंत ४३ धावा) या सलामीच्या जोडीने ९५ धावा फटकावत ऑस्ट्रेलियाला मजबूत सुरुवात करून दिली. गत सामन्यातील अर्धशतकवीर अनिका लिआरॉयड (३५ धावा) आणि कर्टनी वेब (नाबाद २६ धावा) यांनी धावांची भर घालत ऑस्ट्रेलियाची धावसंख्या दोनशेच्या जवळ नेली.

भारताच्या एकाही फलंदाजाने २५ पेक्षा अधिक धावा केल्या नाहीत. दिनेश वृंदा (२१ धावा) आणि मिनू मणी (२० धावा) वगळता भारताचे अन्य फलंदाज धावा जमवण्यात अपयशी ठरले. त्यामुळे भारताला हा सामना एकतर्फी गमवावा लागला.

**हेलीचा हल्लाबोल**

अनुभवी हेलीने पुन्हा एकदा आपला क्लास दाखवला. सहाव्या षटकात तिने राधा यादवला तीन चौकार ठोकले. दहाव्या षटकातही तिने पुन्हा एकदा तीन चौकारांची माळ लावली. मिनू मनीच्या एका षटकात तिने तीन चौकार लगावले.

---

# इच्छापूर्ती गणेश मंदिर पनवेल परिसरात वृक्षारोपण संपन्न

## मा. आ. श्री. प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे मा. विरोधी पक्षनेते श्री. प्रीतम म्हात्रे यांची प्रमुख उपस्थिती

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**
पनवेल महानगरपालिका उद्यान विभाग आणि सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी हितवर्धक संघ यांच्या यांच्या संयुक्त विद्यमाने इच्छापूर्ती गणेश मंदिर परिसरामध्ये नुकतेच वृक्षारोपण करण्यात आले. आमदार श्री. प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते श्री. प्रीतम म्हात्रे यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये हे वृक्षारोपण करण्यात आले. पर्यावरणाच्या संवर्धनासाठी आयुक्त श्री. मंगेश चितळे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे आणि उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपणाचा आणि नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम पनवेल महानगरपालिका उद्यान विभागामार्फत सुरू आहे. या कार्यक्रमाअंतर्गत वृक्षारोपण तसेच पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व लोकांपर्यंत पोहचवण्यासाठी उपस्थित मान्यवरांनी बहावा, अरेका पाम अशा विविध 100 रोपांचे रोपण यावेळी केले.या कार्यक्रमासाठी सिंधुदुर्ग जिल्हा रहिवाशी हितवर्धक संघाचे अध्यक्ष केशव राणे तसेच इतर सदस्य उपस्थित होते .लोकसहभागातून वृक्षारोपणाचे प्रमाण वाढवण्यासाठी आयुक्तांच्या मार्गदर्शनाखाली नागरिकांना मोफत वृक्ष वाटपाचा कार्यक्रम महापालिकेने हाती घेतला असून नागरिकांनी या कार्यक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन महापालिकेच्यावतीने



करण्यात आले आहे. या वृक्षारोपण कार्यक्रमास सहाय्यक आयुक्त डॉ. रुपाली माने, विभागप्रमुख अनिल कोकरे यांच्या मार्गदर्शनाखाली उद्यान पर्यवेक्षक सिद्धार्थ कांबळे, अशोक मुने तसेच सहाय्यक उद्यान पर्यवेक्षक किरण गायकवाड, गजलक्ष्मी आंबे, अजय डांगरकर यांचे मोलाचे सहकार्य लाभत आहे.

---

# मुरुडमध्ये झाडाला राखी बांधून अनोखे रक्षाबंधन !

**दैनिक युवक आधार**
**पंडीत फंगाळ ( पनवेल)**
: मुरुडच्या जंजिरा विद्या मंडळ संचलित सर एस ए हायस्कूल व स्व.म.ल. दांडेकर कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थीनींनी शाळेच्या आवारात झाडाला राखी बांधून भाऊ बहिणीच्या अतुट नात्याचा सण राखी पौर्णिमा साजरी केली.

ज्याप्रमाणे आपल्या बहिणीचे संरक्षण करण्याची जबाबदारी भावाची असते,याची जाणीव ठेवून झाडे देखील आपला भाऊ असून पर्यावरणाचे संरक्षण करत असतात. सर्व बहिणींचे तसेच सर्वांचे संरक्षण करतात या हेतूने या मुलींनी राखी बांधून त्यांचे संगोपन करण्याची इच्छा व्यक्त केली . झाडे लावा झाडे जगवा तरच मानवी जीवनावर होणाऱ्या तापमानाचा परिणाम होणार नाही . आपल्या सर्वांचे मानवी जीवन सुखकर होईल. झाडे आपल्याला सावली देतात, फळे देतात ते निस्वार्थ पणे आपले कर्तव्य पार पाडत असतात. त्याप्रमाणे प्रत्येक नागरिकांनी देखील वृक्ष लागवड करून त्याची वाढ करण्या संदर्भात योग्य तो विचार करून वृक्ष लागवड करून त्याची वाढ करणे ही आज काळाची गरज असल्याचे मनोगतात विद्यार्थीनीनी सांगितले आणि वृक्ष लागवड करून त्याचे संगोपन करण्याचा



जबाबदारी प्रत्येकाने घ्यावी.असे आवाहन केले. ही संकल्पना संस्थेचे संचालक पांडुरंग आरेकर व संगणक विभागाचे केतन वर्तक यांनी अमलात आणली तर शाळेचे मुख्याध्यापक सरोज राणे, पर्यवेक्षक भास्कर मोरे यांचे सहकार्य लाभले.

---

# भारत देश जगात इकॉनॉमिक म्हणून जगात उभारलेला आहे

## (भाजपा मुंबई चिटणीस महेश पारकर)

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रविणभाऊ पवार**
"तिरंगा" हा आपल्या देशाचा अभिमान व सन्मान आहे. आपला राष्ट्रध्वज आपल्यासाठी धैर्याचे व प्रेरणेचे प्रतीक आहे. तिरंगा आपल्या स्वातंत्र्य सैनिकांच्या बलिदानाची आठवण करून देतो. आपल्या ध्वजाचा अधिक सन्मान करण्यासाठी भारतीय जनता पार्टी खार सांताक्रुझ पूर्व मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १० ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११:३० वाजता प्रभात दर्शन इमारत, खार (पुर्व) रेल्वे स्थानक समोर येथून तिरंगा यात्रेचे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. तिरंगा बाईक रॅली प्रसंगी मुंबई चिटणीस महेश पारकर



म्हणाले की, आज भाजपा सपुर्ण देशभरामध्ये तिरंगा रॅली सर्व विभागांमध्ये संपन्न करत आहे. भारताचे शौर्य भारताचा पराक्रम भारताच्या सैनिकाचे पराक्रम गेल्या काही दिवसांमध्ये आपले सिंदूर ऑपरेशन आणि पाकिस्तानात जाऊन पाकिस्तानच्या छाताडावर पृथ्वी मिसाईल झालेला अटॅक हा सर्व जगाला आपल्या लष्कराने दाखवून दिला आहे.

आपले आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदीजीची हिम्मत सर्व जगाने पाहिले आहे. आता भारत देश जगात इकॉनॉमिक म्हणून उभारला जात आहे. आपण जगामध्ये तिसऱ्या क्रमांकावर जात आहे. आपली महाशक्ती अमेरिकेच्या पोटात दुखायला लागली आहे. त्यामुळे त्यांनी आपल्यावर टेरिफोर चालू केला आहे. पण आदरणीय पंतप्रधान मोदीजींनी स्पष्ट शब्द सांगितले तुम्ही टेलिफोर लावा किंवा अजून काही लावा आमचा हिंदुस्तान देश झुकणार नाही आणि वाकणार नाही. लोकांच्या हृदयात देशभक्ति जागृत करणे, आपल्या राष्ट्रध्वजाबद्दल जागरुकता वाढविणे हा 'हर घर तिरंगा' या उपक्रमाचा हाच खरा मुख्य हेतू होता. ही बाईक रॅली खार रेल्वे स्थानक मार्ग साईबाबा रोड, पाईप लाईन, मराठा कॉलेनी, पटेल नगर, वी.एन. देसाई हॉस्पिटल, अब्दुल हमीद चौक गोळीबार येथून श्रीराम मंदिर येथे समाप्त करण्यात आली. या वेळी महेश पारकर, राजेश दाभोळकर, रुपेश मालुसरे, लोकेश दवे, शैलेश पाटील मंडल अध्यक्ष, नवनाथ दिघे अध्यक्ष वॉर्ड ९४, अंकित शाह अध्यक्ष वॉर्ड ८७ सह सर्व आजी माजी पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी सहभागी झाले होते.

---

# मा.सुशील निंबाळकर यांनी आपल्या चेअरमन पदाचा राजीनामा सचिवाकडे सुपूर्त

## पुढील चेअरमन पदी महिला संचालक यांची वर्णी ?

**दैनिक युवक आधार**
**सणसर :- विकास क्षत्रिय**
इंदापूर तालुक्यातील सणसर गावची विविध कार्यकारी सोसायटी सर्वात मोठी म्हणून गणली जाते. त्या सोसायटीचे चेअरमन सुशील निंबाळकर यांनी आपला राजीनामा सचिव संजय सपकळ यांच्याकडे रविवारी सुपूर्त करण्यात आला. कोअर कमिटी यांनी चेअरमन पदाचा दिलेल्या कालावधी संपुष्टात आला असल्यामुळे सुशील निंबाळकर यांनी राजीनामा दिला. ठरल्याप्रमाणे चेअरमन सुशील निंबाळकर यांनी राजीनामा दिला असल्यामुळे सोसायटीचे सभासद व सणसर ग्रामस्थ यांच्याकडून सुशील निंबाळकर यांचे कौतुक केले जात आहे. सुशील निंबाळकर यांनी आपल्या चेअरमन पदाचा राजीनामा दिल्यानंतर कोअर कमिटी सोसायटीच्या चेअरमन पदाच्या खुर्चीवर कोणाला बसवणार आहेत याकडे गावातील नागरिक व सोसायटीचे सभासद यांचे लक्ष लागले



असल्याच दिसून येत आहे.राजीनामा सुपूर्त करते वेळी चेअरमन सुशील निंबाळकर सचिव संजय सपकळ,तुषार निंबाळकर,संचालक पिंटू गुप्ते,युवा नेते विक्रमसिंह निंबाळकर,रणजित राजेभोसले,संजय शिंदे उपस्थित होते.